अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com
शनिवार दि.२९ ऑक्टोबर २०२२ ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : ३२ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८+२०

## कनिष्ठ लिपीक राजू गायकवाड निलंबीत; आयुक्तांनी केली कारवाई

**सोलापूर** : कामात निष्काळजीपणा केल्यामुळे अन्नपरवाना विभागाकडील कनिष्ठ श्रेणी लिपीक राजू गायकवाड याला आयुक्तांनी निलंबीत केले आहे. गायकवाडकडे परवाण्याचे नुतनीकरण करण्याची जबाबदारी सोपविली होती. त्याच्याकडे किती अर्ज आले, किती परवान्याचे नुतनीकरण केले, किती फी वसूल केली याचा आढावा घेतला असता काहीही माहिति मिळू शकली नाही. त्याने बऱ्याच व्यवसायाचे नुतनीकरणे केले नाही असे आढळले. त्यामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान झाले. याबाबत त्याला नोटीसही देण्यात आली होती. त्याचा खुलासा त्याने दिला नाही. त्यामुळे कामात निष्काळजीपणा केल्यामुळे आयुक्तांनी त्याला निलंबित केले.

## वडे तळताना तरुणाचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू

**सोलापूर** : माढ्यात वडे तळताना एका तरुणाचा हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने मृत्यू झाल्याचा घटनेचा व्हिडिओ समाज माध्यमातुन समोर आला आहे. वडे तळताना हॉटेल कामगाराचा मृत्यू झाला आहे. एका तरुणाच्या मृत्यूचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होऊ लागला आहे.तरुणांनी आपल्या आरोग्याची काळजी घेणे किती गरजेचं आहे.हे या उदाहरणावरून दिसून येत आहे.प्रकाश नानूराम कुमार (वय-२८) असे मृत्यू झालेल्या हॉटेल कामगाराचे नाव आहे.सोलापूर जिल्ह्यातील माढा शहरातील एका सुप्रसिद्ध राजस्थानी वडापाव सेंटरमध्ये हे घटना घडली.हि सर्व घटना सीसीटीव्ही झाली आहे.

# तीन महिन्यात चार प्रकल्पांचे टेक ऑफ, ‘टाटा’च्या एअरबसचे गुजरातमध्ये लॅंडिंग


**सुराज्य/सोलापूर**




पळवापळवीनंतर अस्तित्वात आलेल्या ई–डी सरकारला पाच महिने झाले. त्यातील एक महिना तर फक्त मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री या दोघांचे मंत्रिमंडळ अस्तित्वात होते. उर्वरित चार महिन्यातील तीन महिन्यात एक नव्हे दोन नव्हे तर चक्क चार प्रकल्पांनी महाराष्ट्रातून अन्य राज्यांसाठी टेक ऑफ केले आहे. पुण्यात होणारा वेदांता–फॉक्सकॉन प्रकल्प गुजरातला गेल्यानंतर त्याच्या पाठोपाठ ‘टाटा’च्या एअरबसने गुजरातमधील बडोद्याला लॅंडिंग केले आहे. परिणामी तब्बल १.८० लाख कोटी रुपयांचे हे चार प्रकल्प राज्याबाहेर गेल्यामुळे जवळपास एक लाख रोजगारांना महाराष्ट्र मुकला आहे.

अवघ्या तीन महिन्यात महाराष्ट्रातून चार मोठे प्रकल्प इतर राज्यात गेले आहेत. या प्रकल्पांची किंमत १.८० लाख कोटी रुपये इतकी आहे. यामुळे महाराष्ट्राचे आर्थिक नुकसान तर झालेच आहे. शिवाय प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष जवळपास एक लाख रोजगार मिळण्याची संधीही हुकली आहे. आता ऐन दिवाळीत आरोप-प्रत्यारोपांच्या फटाक्यांची आतषबाजी सुरू झाली आहे.

### १. टाटा एअर बस




टाटा एअरबसचा सी-२९५ लष्करी ट्रान्सफोर्ट एअरक्राफ्ट हा नागपूरमधील प्रस्तावित प्रकल्प गुजरातमधील बडोद्याला गेला आहे. या प्रकल्पांची किंमत २२ हजार कोटी रुपये इतकी होती. राज्याचे उद्योगमंत्री आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना टाटा एअरबसचा प्रकल्प नागपूरमधील मिहानमध्ये होईल असा विश्वास होता. या प्रकल्पामुळे प्रत्यक्ष आणि प्रत्यक्ष सहा हजार लोकांना रोजगार उपलब्ध होणार होता.

### २. वेदांता-फॉक्सकॉन

गेल्या काही दिवसांपूर्वी वेदांता-फॉक्सकॉन प्रकल्पही गुजरातला गेला होता. वेदांता-फॉक्सकॉन प्रकल्प १.५४ लाख कोटी रुपयांचा होता. महाविकास आघाडी सरकारच्या काळात वेदांता सोबत झालेल्या चर्चेनुसार, सेमीकंडक्टरचा प्रकल्प हा पुणे जिल्ह्यातील तळेगाव येथे सुरू होणार होता. या प्रकल्पामुळे ८० हजार ते एक लाख रोजगार निर्माण झाला असता. यातील ३० टक्के रोजगार हा थेट रोजगार असणार होता.

### ३. रायगडमधील बल्क ड्रग पार्क



केंद्र सरकारमार्फत देशात चार मोठे बल्क पार्क उभारण्यात येणार आहेत. यातील एक प्रकल्प रायगड जिल्ह्यातील रोहा व मुरूड येथे होणार होता. त्यासाठी ५ हजार एकर जमीन देण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. ३ हजार कोटी रुपयांच्या या प्रकल्पातून ५० हजार जणांना प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार मिळणार होता. पण हिमाचल प्रदेश, गुजरात आणि आंध्र प्रदेशमधील बल्क ड्रग पार्क प्रकल्पांना तत्त्वत:: मान्यता दिली.

### ४. औरंगाबादचा मेडिकल डिव्हाईस पार्क प्रकल्प



औरंगाबादमधील मेडिकल डिव्हाईस पार्क प्रकल्प (वैद्यकीय उपकरणाचे कारखाने) सप्टेंबरमध्ये रद्द करण्यात आला होता. या प्रकल्पामुळे महाराष्ट्रात ४२४ कोटी रुपयांची गुंतवणूक आणि ३ हजार जणांना प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध होणार होता. पण महाराष्ट्रातील प्रकल्पाला मान्यता मिळाली नाही. त्याचवेळी तामिळनाडू, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश आणि हिमाचल प्रदेशमधील मेडिकल डिव्हाईस पार्क प्रकल्पाला मान्यता देण्यात आली.

## निद्रा संपल्याने पंढरीचा श्रीविठूराया पुन्हा अखंड उभा राहणार

**सुराज्य/पंढरपूर**



कार्तिकी यात्रेसाठी येणाऱ्या जास्तीत जास्त भाविकांना विठुरायाच्या दर्शनाचा लाभ देण्यासाठी शुक्रवारपासून देवाचे राजोपचार बंद करून २४ तास दर्शन व्यवस्था सुरू करण्यात आली. आज सकाळी अकरा वाजता विठ्ठल रुक्मिणीचा पलंग काढण्यात आला. देवाचा पलंग निघतो म्हणजेच देवाची रात्रीची विश्रांती थांबली, असे मानले जाते. आषाढी व कार्तिकी यात्रेसाठी राज्यभरातून लाखो भाविक पंढरपूरला येत असतात. यातील जास्तीत जास्त भाविकांना देवाच्या दर्शनाचा लाभ मिळावा यासाठी मंदिर दर्शनासाठी २४ तास खुले ठेवण्याची परंपरा आहे.

त्यानुसार देवाचा आणि रुक्मिणी मातेच्या शेजघरातील पलंग काढून ठेवण्यात येतो. यामुळे देवाची झोप बंद होते. देवाला जागे केले जाते, अशी प्रथा आहे. गेल्या दोन वर्षांपासून कोरोनामुळे पलंग निघत होता, मंदिरही २४ तास खुले राहायचे. मात्र मंदिरात भाविकांना प्रवेश नसायचा. यंदा दोन वर्षानंतर निर्बंधमुक्त कार्तिकी यात्रा होणार असल्याने संपूर्ण यात्रा काळात आता लाखो भाविकांना २४ तास दर्शन मिळणार आहे.

मंदिर समितीचे सदस्य ज्ञानेश्वर महाराज जळगावकर, माधवी निगडे, शकुंतला नडगिरे यांच्या हस्ते पूजेनंतर विठुरायाच्या पाठीला लोड तर रुक्मिणी मातेच्या पाठीला तक्क्या लावण्यात आला. चोवीस तास दर्शनाला उभारून देवाला शिणवटा जाणवू नये यासाठी विठ्ठल रुक्मिणीच्या पाठीला मऊ कापसाचा लोड आणि तक्क्या लावण्याची परंपरा आहे. इतर वेळा विठुरायाच्या राजोपचाराला पहाटे चार वाजल्यापासून सुरुवात होत असते. ती रात्री शेजारतीपर्यंत म्हणजे रात्री साडेअकरा वाजता मंदिर बंद होत असते. आता देवाचा पलंग निघाल्यामुळे दिवस भरात सकाळी देवाचे स्नान नित्यपूजा, दुपारी महानैवेद्य आणि संध्याकाळी लिंबूपाणी एवढ्याचसाठी दर्शन बंद राहणार असून उरलेल्या सर्व वेळात दिवसरात्र देव अखंड दर्शनासाठी उभा असणार आहे. सर्वसाधारणपणे यात्रा काळात म्हणजे मंदिर २४ तास दर्शनासाठी खुले राहणार आहे.

## गांधी झोपडपट्टी येथे वृद्धेचा खून; दोन महिलांसह तिघांना अटक

**सोलापूर** : पूर्वीचे भांडण आणि उसने दिलेल्या पैशाच्या वादातून लाथा बुक्क्याने केलेल्या मारहाणीत ६० वर्षीय महिला गंभीर जखमी होऊन मरण पावली. ही घटना जेलरोड परिसरातील राहुल गांधी झोपडपट्टीत गुरुवारी सकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणात पोलिसांनी दोन महिलासह तिघांना अटक करून पोलीस कोठडी घेतली आहे.

अंबू विठ्ठल कट्टीमनी (वय६० रा.राहुल गांधी झोपडपट्टी, मशिदी जवळ) असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे. या प्रकरणात जेलरोडच्या पोलिसांनी मयताची बहीण नंदा चिकाटे (वय ६१) तिचा मुलगा चंद्रकांत उर्फ बबलू चिकाटे( वय२४) आणि संतोषी उर्फ संतु चिकाटे (वय २७ सर्व रा. राहुल गांधी झोपडपट्टी) या तिघांना अटक केली. त्यांना ३ दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश न्यायालयाने दिला. अंबु कट्टीमनी यांना त्यांच्या घरासमोर बेदम मारहाण केली होती. त्यांना शासकिय रुग्णालयात दाखल केले असता त्या सायंकाळी मरण पावल्या. दरम्यान या घटनेची फिर्याद मयताची सून सुरेखा नितीन कट्टीमनी (वय २५ रा.राहुल गांधी झोपडपट्टी) यांनी पोलिसात केली. त्याप्रमाणे पोलिसांनी तिघांना अटक करून कोठडी घेतली.

## सांगोला शेतकरी सूत गिरणी निवडणूक बिनविरोध



**सांगोला** : सांगोला शेतकरी सहकारी सूतगिरणीच्या संचालक मंडळाची निवडणूक बिनविरोध झाली.एकूण सतरा संचालकांची अविरोध निवड झाली. स्व.गणपतआबा देशमुख यांनी सांगोल्याच्या प्रत्येक सहकारी संस्थांमध्ये राजकारण न आणण्याचे पथ्य पाळले होते. त्यांच्या पश्चात डॉ.बाबासाहेब देखमुख व डॉ.अनिकेत देशमुख या दोन नातवांनी बिनविरोधाची ही परंपरा कसोशिने जपली. गणपतरावआबांच्या निधनानंतर प्रथमच होणाऱ्या निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष लागले होते. सांगोल्याच्या आजी-माजी आमदारांनी देशमुख यांना साथ दिली. स्थापनेपासूनच शेतकरी सहकारी सूत गिरणीची निवडणूक बिनविरोध होत आहे.

दरम्यान, राज्यात पूरस्थिती निर्माण झाल्याने सहकार, पणन व वस्त्रोद्योग मंत्रालयाने ३० सप्टेंबरपर्यंत ही निवडणूक स्थगित केली होती. त्यानंतर सहकार विभागाने १२ ऑक्टोबरपासून निवडणूक कार्यक्रम जाहीर केला. अर्ज माघारी घेण्याच्या शेवटच्या दिवशी सतरा जागांसाठी फक्त १७ उमेदवार शिल्लक राहिल्याने ही निवडणूक बिनविरोध झाली. बिनविरोध निवडणुकीसाठी देशमुख यांचे नातू डॉ बाबासाहेब देशमुख आणि डॉ अनिकेत देशमुख यांना आमदार शहाजी पाटील, माजी आमदार दीपक साळुंखे यांनी मोलाचे सहकार्य केले. संचालक मंडळ पुढीलप्रमाणे (कापूस उत्पादक शेतकरी मतदारसंघ) : चंद्रकांत देशमुख (सांगोला), अण्णासाहेब देशमुख (सांगोला), संतोष पाटील (महूद), नितीन गव्हाणे (कडलास), भारत बंडगर (अनकढाळ), बाबासाहेब करांडे (लोटेवाडी), विश्वंभर काशीद (पंढरपूर). बिगर कापूस उत्पादक शेतकरी मतदार संघ : मधुकर कांबळे (सांगोला), अंकुश लक्ष्मण बागल (खिलारवाडी), विक्रांत गायकवाड (कडलास), दिलीप देशमुख (कोळे).

**● संस्था प्रतिनिधी मतदार संघ**

सागर लवटे (लोटेवाडी). अनुसूचित जाती/जमाती मतदार संघ : बाळासाहेब बनसोडे (सांगोला). महिला राखीव मतदार संघ : ताई मिसाळ (पाचेगाव), सीतादेवी चौगुले (गुंजेगाव, ता. मंगळवेढा). इतर मागासवर्गीय मतदार संघ- प्रभाकर माळी (सांगोला). वि.जा/ भ.ज./ वि.मा.प्र.मतदार संघ : कुंडलिक आलदर (कोळे).

**● सर्वांची साथ मिळाली : डॉ. देशमुख**

सांगोला सूतगिरणीची निवडणूक बिनविरोध करण्यासाठी शेकापच्या सर्वच सहकाऱ्यांची साथ लाभली. तसेच, आमदार शहाजीबापू पाटील व माजी आमदार दीपक आबा साळुंखे यांनीही निवडणूक बिनविरोध करण्यासाठी मोलाची साथ दिली आहे, असे गणपतराव देशमुख यांचे नातू आणि पुरोगामी युवक संघटनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी सांगितले.

## गळफास घेत इसमाची आत्महत्या

**सोलापूर** : एमआयडीसी परिसरातील आशा नगर येथे मंदिरासमोरील लिंबाच्या झाडाला एका ४२ वर्षीय विवाहित इसमाने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना शुक्रवारी सकाळी उघडकिस आली. सुनील शंकर घुले (वय ४२ रा.आशानगर) असे मयत इसमाचे नाव आहे. त्याचा मृतदेह पोषम्मादेवी मंदिराच्या आवारातील लिंबाच्या झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. या घटनेची नोंद एमआयडीसी पोलिसात झाली आहे. हवालदार पवार पुढील तपास करीत आहेत.

## नदीत बुडाल्याने महिलेचा मृत्यू

**सोलापूर** : कपडे धुताना नदीच्या पाण्यात पडल्याने मीनाक्षी राजू घोरपडे (वय ४२ रा. बेगमपेठ सोलापूर,सध्या रा. तिर्हे ता.उत्तर सोलापूर) ही महिला मरण पावली. त्या बुधवारी सकाळी तिर्हे येथील नदीच्या काठाजवळ कपडे धुत होत्या. त्यावेळी पाय घसरून पाण्यात बुडाल्याने त्या मरण पावल्या. या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



त्यांनी फराळ व्हॉट्सअपवर पाठवलाय!!

# कार्तिकी यात्रा : नदीपात्रात पाणी सोडण्याबाबत नियोजन करा

## जिल्हाधिकारी मिलींद शंभरकर यांच्या सूचना

**पंढरपूर** : कार्तिकी यात्रा कालावधीत वारकरी सांप्रदाच्या प्रथा परंपरेप्रमाणे चंद्रभागा वाळवंटात भजन व किर्तन करण्यासाठी परवानगी देण्यात आली आहे. त्या अनुषंगाने चंद्रभागा नदीपात्रातील वाळवंट भजन, किर्तनासाठी रिकामे राहील याची दक्षता घेवून पाणी सोडण्याबातचे नियोजन पाटबंधारे विभागाने करावे, चंद्रभागा नदीपात्रात मोठ्या प्रमाणात भाविक स्नानासाठी जातात तेथे पाणीपातळी बाबतचे सूचना फलक लावावेत अशा सूचना जिल्हाधिकारी मिलींद शंभरकर यांनी दिल्या.

कार्तिकी यात्रा कालावधीत भाविकांच्या सोयी-सुविधासाठी प्रशासनाकडून करण्यात येणाऱ्या नियोजनाबाबत शासकीय विश्रामगृह पंढरपूर बैठक घेण्यात आली. बैठकीस जिल्हा पोलीस अधिक्षक शिरीष सरदेशपांडे, अप्पर जिल्हा अधिकारी तथा मंदीर समितीचे कार्यकारी अधिकारी संजीव जाधव, अप्पर पोलीस अधिक्षक हिम्मत जाधव, राज्य उत्पादन शुल्कचे अधिक्षक नितीन धार्मिक, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड, प्रांताधिकारी गजानन गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम, उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंचल पाटील, तहसिलदार सुशिल बेल्हेकर, स्वप्निल रावडे, मुख्याधिकारी अरविंद माळी, कार्यकारी अभियंता दत्तात्रय गायकवाड, भीमा पाटबंधारे विभागाचे महेश चौगुले, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.एकनाथ बोधले यांच्यासह संबधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.



जिल्हाधिकारी शंभरकर म्हणाले, नदी पात्रातील घाटावर आवश्यक ठिकाणी बॅरेकेटींग करावे. स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा मुबलक पाणी पुरवठा करावा. शहरात ठिकठिकाणी दिशादर्शक माहिती फलक लावावेत. ६५ एकर मधील दिंड्यांना प्लॉटचे वाटप करण्यासाठी नियोजन करावे. तसेच तेथे मुबलक प्रमाणात पाणी, स्वच्छता राहिल याची दक्षता घ्यावी. अतिक्रमण काढण्यासाठी जादा पथकाची नेमणूक करावी यासाठी पोलीस प्रशासनाची मदत घ्यावी. यात्रा कालावधीत वाहतुक व्यवस्था सुरळीत रहावी तसेच भाविकांना सुरक्षेबाबत कोणतेही अडचण येऊ नये यासाठी पोलीस प्रशासनाने आवश्यक नियोजन करावे. तसेच मंदीर समितीने पत्राशेड, स्काय वॉकचे संरचनात्म परिक्षण (स्ट्रक्चरल ऑडीट) करुन घ्यावे अशा सूचनाही जिल्हाधिकारी शंभरकर यांनी यावेळी दिल्या. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी तथा मंदीर समितीचे कार्यकारी अधिकारी संजीव जाधव यांनी कार्तिकी यात्रा कालावधीत मंदीर समितीमार्फत करण्यात आलेल्या नियोजनाची माहिती दिली.

### दिंडींसोबत येणाऱ्या बैलजोडीच्या आरोग्याची तपासणी करण्याचे निर्देश

कार्तिकी यात्रेसाठी राज्यातील इतर जिल्ह्यातून दिंड्या काही प्रमाणात येतात. दिंडीतील पालखीच्या रथासाठी बैलजोडी येत असतात. सध्या राज्यात लम्पी आजाराचा प्रादुर्भाव असल्याने दिंडींसोबत येणाऱ्या बैलजोडीच्या आरोग्याची तपासणी पशुवैद्यकीय विभागाने करावी. यासाठी विविध ठिकाणी पशुवैद्यकीय पथकाची नेमणूक करावी. आरोग्य विभागाने तज्ञ डॉक्टरांसह वैद्यकीय पथकाची नेमणूक करावी. तसेच फिरते वैद्यकीय पथक व औषधसाठा मुबलक उपलब्ध राहील याबाबत नियोजन करावे, असेही निर्देश जिल्हाधिकारी शंभरकर यांनी दिले.

# ठाकरेंची उपरती

राजसत्ता आणि पक्षीय सत्तेपेक्षा कुठलीही व्यक्ती मोठी नसते. राजसत्ता ही लोकांनी दिलेली असते तर पक्ष म्हणजे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचा समूह असतो. मुख्यमंत्री हे सत्तेचे तर पक्षप्रमुख हा पक्षाचा सेनापती असतो. मुख्यमंत्र्यांनी लोकांशी तर हायकमांडने पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा आब राखला पाहिजे.हा लोकशाहीचा संकेत आहे. जर हे तत्त्वच पाळले जात नसेल तर जनता जनार्दन सत्ता कधीही उलथवून टाकू शकते तर कार्यकर्ते केव्हाही बंड करून हायकमांड्ची खुर्ची केव्हाही हालवू शकतात.पाच महिन्यांपूर्वी राज्यात तेच घडले. आमदार व पदाधिकारी यांचा सन्मान न राखल्यामुळे शिवसेनेत मोठे बंड झाले. त्यामुळे उद्धव ठाकरे यांचे सरकार गडगडले शिवाय. राज्याच्या कानाकोपऱ्यातील शिवसेनेचा बुरूज ढासळला गेला. शिवसेनेच्या स्थापनेपासून पक्षाशी एकनिष्ठ असणारे एकनाथ शिंदे यांच्यासोबत ४० आमदारांनी बंड केले. ठाकरे यांच्यासाठी हा जबर दणका म्हणावा लागेल. कारण एक-दोन नव्हे तर ४० आमदार फुटतात हे कशाचे द्योतक आहे. इतकी नाराजी का निर्माण झाली? त्याचे परिणाम आज काय भोगावे लागत आहेत. सत्ता तर गेलीच गेली. शिवाय लोकांच्या मनात बसलेले धनुष्यबाण गोठवले गेले. त्याचबरोबर शिवसेनेची मोडतोडही झाली. पदोपदी ठाकरेंची अस्वस्थता बाहेर पडत गेली. ही वेळ का आली? यावर वेळीच चिंतन व्हायला हवे होते पण तेवढे सौजन्य ठाकरेंकडून दाखवले गेलेले नाही, अशी राज्याची शोकांतिका आहे. कटुता संपवा म्हणून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना कटुता आवाहन करण्याची नामुष्की ठाकरेंवर ओढवलीय. राज्याच्या राजकारणात निर्माण झालेली कटुता संपवा अशी साद शिवसेना ठाकरे गटाचे मुखपत्र असलेल्या 'सामना'तून फडणवीस यांना घालण्यात आली आहे. राज्याच्या राजकारणात कटुता निर्माण झाल्याचे वक्तव्य फडणवीस यांनी केले होते. त्या पार्श्वभूमीवर फडणवीस यांना कटुता संपवण्यासाठी पुढाकार घेण्याचा सल्ला दिला गेलाय. मात्र,



हे खरोखर आवाहन केले की-फडणवीस यांच्यावर तिरकस टीका केली, हे तपासून पहावे लागेल. शिंदे गटावरही निशाणा साधण्यात आला आहे. फडणवीस यांचा मूळ स्वभाव हा सामोपचाराने मिळून मिसळून वागण्याचाच होता. पण सत्ता गेल्यामुळे ते बिघडले. सत्ता येते व जाते. माणसाने मूळ स्वभाव बदलण्याची गरज नाही. विजयानंतर आनंद होत असला तरी उन्माद चढणे हे प्रौढत्वाचे लक्षण मानले जात नाही. फडणवीस यांच्यात नव्या सत्तांतरापासून प्रौढपणा आला असल्याचे जाणवू लागले आहे, अशी उपहासात्मक टिप्पणी ठाकरे यांनी केली आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात केवळ कटुता नव्हे तर सुडाच्या राजकारणाचे विषारी प्रवाह उसळत आहेत व या प्रवाहाचे मूळ भाजपच्या अलिकडच्या राजकारणात आहे, असा आरोपही त्यांनी केला आहे पण भाजपला दोष देण्यात काय अर्थ? आपला पक्ष का फुटला याविषयी ठाकरेंचे चिंतन का होत नाहीय. भाजपवाल्यांनी केंद्रीय सत्तेचा गैरवापर करून सरकार पाडले. शिवसेना फोडली. शिवसेनेचे धनुष्यबाण चिन्ह गोठवले जावे यासाठी पडद्यामागून राजकीय सूत्रे हलवली गेली, हे सर्व महाराष्ट्राने आणि देशाने पाहिले, असा ठपका भाजपवर ठाकरेंनी ठेवला आहे. कदाचित त्यांचे हे विधान बरोबर ठरेल पण ठाकरे यांनी मुळात कोणकोणत्या चुका केला हे का सांगितले जात नाही. २०१९ची निवडणूक युतीमधून लढवली. जनतेने बहुमताची सत्ताही दिली. असे असताना दोन काँग्रेसशी हात मिळवणी का केली? हा राज्याचा सवाल आहे.राज्याला जे नको होते, त्यांच्याशीच आघाडी केली हे कितपत योग्य आहे? आघाडी करून मुख्यमंत्रिपद घशात घालून घेतले? त्यातून काय साध्य झाले? सत्ता आली तरी आपण मुख्यमंत्री होणार नाही, हे शिवसेनाप्रमुखांचे तत्त्व पाळले नाही? शिंदेंना मुख्यमंत्री का केले नाही? असा नानाविध प्रश्न राज्यातून आजही उपस्थित केले जात आहेत. बहुमताचा आदर करून ठाकरे यांनी भाजपला बाहेरून पाठिंबा दिला असतात तर शिवसेना अजून मोठी झाली असती. बहुमत असतानाही महिनाभर सत्तेचा निर्णय झाला नाही. हा अहंकार कोणाचा? हिंदुत्वाच्या मुद्यावर भाजप-शिवसेना यांची युती झाली. ती पंचवीस-तीस वर्षे टिकली. त्यातून दोघांनाही राजकीय लाभ झाला आहे. कुणा एकट्याला नाही.आता ठाकरे यांना भविष्यकाळ पहावा लागणार आहे. विधानसभा व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आघाडी स्थिरावेल का? हा खरा प्रश्न आहे. तेव्हा कटुता संपवण्यासाठी ठाकरेंनी एक पाऊल मागे घेण्याची गरज आहे. अजूनही वेळ गेलेली नाही.

# अस्वस्थ वर्तमान आणि अस्तास चाललेली संवेदना

**आज संपूर्ण समाज एका अत्यंत अस्वस्थ पर्वातून जात आहे. सध्याचे वर्तमान अत्यंत धकाधकीचे आहे. काळ प्रचंड वेगाने धावतो आहे. सकाळी कळलेली माहिती संध्याकाळपर्यंत शिळी होत जात आहे आणि ओटीत नवेच काही पडत आहे. माणसाला एकमेकांसाठी वेळ नाही. अगदी स्वत:साठी सुद्धा नाही. तो मोबाईल, टीव्ही यासारख्या माध्यमात प्रचंड व्यस्त आहे. आभासी जगाशी जितका तो जोडला जात आहे आतून तितकाच तुटतो आहे. टॉलस्टॉय याच्या कथेमधल्या माणसाने सध्याच्या प्रत्येक व्यक्तीचा ताबा घेतला आहे.**

जो तो स्वप्न उराशी बाळगून उरफुटेपर्यंत धावतो आहे आणि स्वप्न सत्यात उतरण्याआधीच त्याचा श्वास थांबतो आहे. मोबाईल नावाचे यंत्र ज्याचे फायदे अनेक आहेत पण, त्या यंत्राचे तोटे सुद्धा तितकेच आहेत आणि आपण फक्त त्याचे तोटे निवडत आहोत. अर्थात ही निवड आपलीच आहे. घर, कुटुंब, कुटुंबातील संस्कार, एकमेकांशी असलेला घट्ट जिव्हाळा, एकोपा, एकमेकांशी असलेले घट्ट धागे आतल्या आत तुटत चालले आहेत. म्हणून रोजचे वर्तमानपत्र उघडले की अस्वस्थ करणाऱ्या हजारो बातम्या डोळ्यापुढे अंधार पसरवत आहेत. घरातील मुले अतिशय विक्षिप्त वागत आहेत. सहनशक्ती, विवेक, सारासार विचार करण्याची क्षमता, प्रेम, माया, वात्सल्य या सगळ्याच गोष्टी इतिहास जमा होतील की काय अशी भीती वाटत आहे.

आईने 'शाळेत जा' म्हणून नववीतल्या १४ वर्षाच्या मुलाला सांगितल्यानंतर जो झोका खेळता खेळता तो लहानाचा मोठा झाला त्यात झोक्याच्या दोरीने त्याने गळफास घेतला. याला काय म्हणावे? शेतमजूर असलेल्या आई-वडिलांना आपल्या वाट्याशी आलेली मजुरी मुलाच्या वाट्याला येऊ नये त्याने शाळेत जावे हे वाटणे चुकीचे आहे काय? हाच मोठा हा गुन्हा ठरावा काय? कितीही दुर्दैवी घटना! एक उच्चभ्रू कुटुंबातील इंजिनिअरिंगची मुलगी तिच्यावर एक मुलगा एकतर्फी प्रेम करतो तो तिला वारंवार त्रास देतो. तिचे कुटुंब त्याच्याविरुद्ध कॉलेजमध्ये तक्रार करते. शाळेतील प्राचार्य, शिक्षक त्याला समजावून सांगतात. त्याच्या घरच्या लोकांना बोलावले जाते. तिच्या घरचे लोक त्याच्या घरच्या लोकांना त्याला समजावून सांगतात. थोड्या काळासाठी प्रकरण थंड होते. मुलींचा त्रास बंद होतो. तो शांत राहतो आणि एके दिवशी मैत्रिणींबरोबर ती कॉफी शॉपमधून कॉलेजकडे जात असताना भर दुपारी निर्मनुष्य रस्त्यावर तो तिला खेचत कॉलेजच्या पाठीमागे घेऊन जातो आणि तिचा गळा दाबून खून करतो. तिच्या मैत्रिणीला तिला वाचवण्याची संधीही मिळत नाही. कॉलेजच्या कॅमेऱ्यामध्ये ही घटना कैद होते आणि मोबाईलवर हे दिसते. हे पाहताना उरात अनेक वेदना होतात.

एक मुलगी वैद्यकिय शिक्षण घेत असते.कॉलेजच्या वस्तीगृहात राहते. तिसऱ्या मजल्यावर एका रूममध्ये ती राहत असते. त्या वस्तीगृहाच्या समोर एका इमारतीचे काम सुरू असते. त्यावरच्या गवंडी काम करणाऱ्या उत्तरप्रदेशातील एका कामगाराचे तिच्याकडे लक्ष जाते. तो तिच्यावर पाळत ठेवतो. एके दिवशी तिच्या मजल्यावर ती एकटीच असते. बाकीच्या मुली सुट्टीनिमित्त घरी गेलेल्या असतात. हा कामगार त्या इमारतीवर चढतो त्या मजल्यावर उतरतो. रुमचे दार ठोठावतो बेसावधपणे ती दार उघडते. तो आत शिरतो तिच्यावर अत्याचार करतो, क्षणात तिला संपवतो. औरंगाबादच्या पोलिसांनी सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या सहाय्याने त्याचा राहुल शर्मा या आरोपीचा कसून शोध घेतला. कोर्टात केस उभी राहते. एक वकिल त्याची केस लढतो आणि पुराव्याअभावी त्याची निर्दोष मुक्तता होते. मृत्यूनंतरही तिला न्याय भेटत नाही. एक वकिल त्यालाही मुली असतीलच ना, त्याच्या घरात अथवा नातेवाईकांमध्ये असतील ना; अशा हत्याराला निर्दोष सोडण्यासाठी प्रयत्न करताना त्याच्यातील विवेक माणुसकी, वात्सल्य जागे होत नाही. एका बलात्काऱ्याला पुन्हा एका अशाच निष्पाप मुलीवर अत्याचार करण्यासाठी कायद्याने मुक्त केले जाते. मृत्यूनंतरही अत्याचारीत मुलीला न्याय मिळत नाही.



डॉक्टर मुलीचे स्वप्न पाहणाऱ्या आई-वडिलांच्या मनाला किती वेदना झाल्या असतील. कोणी या कोर्टाच्या निकालानंतर प्रतिक्रिया व्यक्त केली नाही. मी सुखी आहे ना बस्स बाकी मला काय करायचे? मी कशाला यात पडायचे? हीच स्वार्थी वृत्ती सगळ्याच बाबतीत!

एक स्त्री संध्याकाळच्या वेळी गावापासून दूर असलेल्या शेतातून घरी जाण्यासाठी एका वाहनात बसते. त्या वाहनातील हैवान निर्मनुष्य जागेत नेऊन तिच्यावर अत्याचार करतात मारून टाकून निघून जातात. स्त्रीवरील, मुलींवरील अत्याचारांना कोणतीही सीमा राहिली नाही आणि लोक नवरात्रात नऊ दिवस शक्तीची देवीची आराधना करतात, जागोजागी देवी उभ्या केल्या जातात. तिच्यासाठी मंदिरात जातात, तीर्थक्षेत्री हजार मैलांचा प्रवास करून दर्शन घेतात. या तिच्या रुपावरील अत्याचाराने कोणाचे मन मात्र हळहळत नाही आणि कोणीच याच्याबद्दल अवाक्षर ही काढत नाही. लहान मुले सुद्धा गुन्हे करताना अजिबात कचरत नाहीत. एक मुलगा अतिशय व्यवस्थित प्लॅनिंग करून जन्मदात्या आईची हत्या करतो आणि नंतर अगदी निर्विकार राहतो. त्याच्या चेहऱ्यावर कुठेही त्याने केलेल्या घृणास्पद कृत्याबाबत पश्चातापाची रेषा ही उमटलेली दिसत नाही. जिची हत्या केली त्या आईने त्याच्या जन्माच्या वेळी किती वेदना सोसल्या असतील, चिऊ काऊचे घास भरवून त्याला मोठे केले असेल, बोलायला, चालायला शिकवले असेल. त्याच्या आवडीचे पदार्थ करून खाऊ घातले असतील, तो आजारी असताना त्याची सेवा केली असेल अशा आईबद्दल त्याला काहीच कसे वाटले नसेल हे कल्पनेतून भयानक वास्तव मनाला चटका लावून जाते. काय झालेय ह्या नव्या उगवत्या पिढ्यांना समजत नाही. खेडोपाडी बांधावरून होणाऱ्या भांडणांमध्ये अनेक हत्या अगदी सहज केल्या जातात.

शेतातले करंजाचे झाड का तोडले? हे विचारणाऱ्या शेजारच्या शेताच्या मालकिणीला जाग्यावर संपवले जाते, तिच्या मुलाला गंभीर जखमी केले जाते. पन्नास रुपयांच्यासाठी एखादी व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीला सहजपणे मारते. माणसे इतकी क्रूर निर्दयी का झाली आहेत? त्यांच्यातली दया, माया, ममता, संवेदना कशी संपून गेली आहे काहीच कळत नाही. एकीकडे देवालयामध्ये, सर्वच धर्मांच्या धार्मिक स्थळावरील गर्दी वाढते आहे. व्रतवैकल्यांचे अवडंबर पूर्वीपेक्षा कितीतरी पटीने वाढले आहे. मग माणसे शांत, सुखी, समाधानी, विचारी, विवेकी का बनत नाहीत? देवालाही त्यांनी हातातले खेळणे बनवले आहे. देवही फक्त त्यांच्यासाठी एक सोय आहे. एखादे व्रत केले नाही तर देवाची अवकृपा होईल म्हणून घाबरणारे लोक इतरांची हातोहात फसवणूक करताना, चोरी करताना, स्त्रीभ्रूण हत्या करताना, स्त्री अत्याचार, खून, मारामाऱ्या, दरोडे टाकताना देव नावाच्या शक्तीला अजिबात घाबरत नाही. लोक फक्त स्वार्थासाठी देवाला सुद्धा वापरतात. देव धर्मासाठी एकमेकांच्या जीवावर उठतात. कोणताही धर्म असो त्याच्यातील धर्मांधता नेहमीच व्यक्तीला आंधळे बनवत असते.

विनोबा भावे धर्माबद्दल खूप छान सांगतात. आपल्याला मानव प्रेमाचा धर्म स्थापन करायचा आहे. त्यात पूजाअर्चा राहणार नसून मानवसेवा येईल. शबरी भिल्लीनीची बोरे रामाने खाल्ली. कारण त्यामध्ये केवळ प्रेम ही भावना होती. प्रेमासमोर सारे धर्म क्षीण होतात. याच प्रेम धर्माची आपल्याला स्थापना करायची आहे. समाज हाच देव आहे व व्यक्तीने त्याची पूजा करायची आहे. समाज म्हणजेच नारायण आहे. त्याची सेवा म्हणजेच ईश्वराची सेवा आहे.

(पूर्वार्ध)

**- डॉ. स्मिता पाटील, मोहोळ.**

## टुडेज् ब्लॉग

# खरेच सात्विकांना उबग आलाय...

**केंद्रसरकारने ऊसाची एफआरपी पंचवीसशेवर नेली आणि दिवाळीची अनोखी भेट दिली आहे. शेतकऱ्यांची बाजू केंद्र सरकारने जोरकसपणे मांडली असून अशीच कणखर भूमिका कामगारांच्या पीएफबद्दल घ्यायलाच हवी. अर्थात ८६०३२ हा जुना वाण असून सध्या २६२ हा ऊसाचा वाण शेतकऱ्यांमध्ये लोकप्रिय झाला आहे. शेतकऱ्यांच्या मर्जीतला वाण २६२ हा सध्या फार्मात आला असून शेतीमधले तण अधिक माजुरे झाले असून मोठ्या कष्टाने शेतकरी शेतीची लागण करतो आहे. राज्याच्या आनंद योजनेचे वाटप ऑनलाईन असल्यामुळे शिधा वाटपाचे काम उरकत नव्हते. थमपीन करण्याला मर्यादा येत होत्या. आता ऑनलाईन ऐवजी ऑफलाईन वाटप सुरु केल्यामुळे आनंदयोजनेच्या शिधा वाटपाला गती मिळाली आहे. फराळाच्या वाटपाबरोबरच यंदा पाऊस-पाणी चांगले असल्यामुळे जरी २६५ चा बोलबाला अधिक असला तरी ४३४ हे ऊसाचे वाण शेतकऱ्याला अधिका उपकारक आहे. सध्या शेतीला तणमाजुरीने बेजार केले असून तोंडाळ नेत्यांच्या शिवराळपणामुळे तणमाजुरीचा प्रभाव अधिक असला तरी भास्करराव जाधवांच्या बेफाम शिव्यांच्या फणपाळीमुळे अनेक गटारातल्या वेचीव शिव्या भास्करराव जाधव संकलित करीत आहेत. दिवाळीचे गोड-धोड खाता-खाता राजकारणातला कलगीतुरा आणि शिव्यांची लाखोली याचा सात्वीक माणसांना वाचकवर्गाला मोठा उबग आला आहे.**

भारतीय जनता पक्ष सागरासारखा विशाल असून या सागराला विकासकामाच्या अनेक नद्या मिळत असतात. त्याबरोबरच ओढे-नालेही मिलनासाठी आतूर झालेले असतात. कारण राष्ट्रीयत्वाचा प्रभाव, देशाबद्दलचा मोठा अभिमान आणि जगभरात सुरु असलेले हिंदुत्वाचे संघटन अत्यंत शिताफीने गतिमान झाले आहे. यामध्येच आघाडीतले तिन्ही पक्ष निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन ठेचा-भाकरी खाऊन आंदोलन अधिक ठळकपणे लोकांसमोर येत आहेत.

ठेचा-भाकरीची सवय नसलेल्या एसी गाडीतल्या नेत्याने फोटोपुरती ठेचा-भाकर खाल्ली तर पचनाला बाधक ठरते. सवय नसलेल्या माणसाला पोटात तुपाचा आणि ठेचा-भाकरीचा संघर्ष परवडत नाही. आता सगळ्यांनीच कुवतीप्रमाणे दिवाळी साजरी केली असून साधारण दिवाळी आनंदयोजनेच्या शिधा वाटपासाठी सेना-भाजपा सरकारने ६८० कोटी रुपये आणि पॅकिंग, जाहिरात, वाहतुकीसाठी १०० कोटींवर खर्च केला असून काटा मारणे, वजनात कमी देणे या वाटपावर पारदर्शी वाटपाची काळजी घेत मोठी कसरत भाजपाला करावी लागली. हे सारे सात्त्विक देवाचे काम भाजपला सुचलेच कसे 'आम्ही जाणते नेते असून देखील अडीच वर्षात आम्हांला का आकलन झाले नाही' याबरोबरच उध्दवजींना आपण भिंतीवरच्या चित्रासारखे शांत कसे राहिलो याबद्दलची मोठी चिंता वाटते.

दिवाळीचा मुहूर्त साधून शिंदे-फडणवीस जोडीने पारदर्शी वाटपाची काळजी घेत मोठी कामाची कसरत पार पाडली आहे. आघाडीमधील आम्ही सगळे हाडाची शेतकरी असताना ढोल बडवत असतो. तरी अडीच वर्षात दिवाळीभेट गरीबांपर्यंत पोहोचलीच कशी याबद्दलचे मोठे दु:ख तिन्ही पक्षांच्या नेत्यांना झाले आहे. यामुळेच राज्यातले मोजके तोंडाळ विरोधक शिवराळपणाची जळाऊ लाकडाची वखार सोबत घेऊनच फिरत आहेत. तीन पीढ्या शेवाळलेले राजकारण करीत असलेले नेते मोठी आगपाखड करीत आहेत. कारण शहाणपणाचा मक्ता आमच्याकडं असून लोकांच्या जवळ जाण्याचा मार्ग सरकारने कसाकाय अचानक हाताळला याची आघाडीला मोठी चिंता वाटते.

दुबळ्या लोकांना प्रती महिना डोल वाटपाचे ऋण लक्षात होते. आठवणीचे सत्कार्य असेल तर त्याचे तोंडभरून कौतुक करावे. त्याच धर्तीवर गेल्या नऊ वर्षात कोणत्याही शेतकऱ्याने निवेदन दिले आहे. मदतीचा अर्ज केला नाही. तरी नियतीचे कर्तव्य म्हणून वर्षाला सहा हजार रुपये शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होतात. हे सारे दातृत्वाचे वैभव असून मंदिरसंस्काराचा प्रभाव आहे. म्हणूनच वर्षाला सहा हजार रुपये शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होतात. शेतीच्या पेरणीला किंवा मुलांच्या गणवेशाला हक्काची बँकेतील रक्कम उपयोगी पडते. राष्ट्राचा रखवालदार जेव्हा नियतीशी करार करून गरिबांना आधार देतो. हे सगळे कर्तव्य पार पाडताना प्रधानमंत्र्यांना गेल्या नऊ वर्षाच्या प्रशासनात कोणताही डाग लागला नाही. तर राज्यात देखील निष्कलंक चारित्र्याचे देवेंद्रजी आणि एकनाथजी मोठ्या जबाबदारीने आपली भूमिका पार पाडत आहे. म्हणूनच ज्यांना भुईमुगातले कळत नाही, ते शेतकऱ्यांसाठी राबतात आणि ज्यांना भुईमुगातले अधिक कळते असा आव आणतात ती शहाणी व जाणती माणसे मात्र, शेतीहिताकडे पाठ फिरवतात. अशी जातकुळी बहुजन पोरांना आकलन झाले आहे.

**- प्रा. लक्ष्मण ढोबळे,**

(माजी मंत्री) भाजपा प्रांतिक सदस्य, सोलापूर.

## बोधकथा

# वडिलांना मदत



भगवान बुद्ध त्या काळात आपल्या शिष्यगणांसह गावोगावी जात होते. एका गावाच्या वेशीवर एक वृद्ध आपल्या मोठ्या टोपलीतून भाजी विकण्यास बसला होता.

ती टोपली जड होती व त्याला तेथून दुसरीकडे जायचे होते म्हणून येणाऱ्या-जाणाऱ्या वाटसरुंना तो आपल्या डोक्यावर टोपली ठेवण्यास मदत करण्याची याचना करत होता. पण कोणीही त्याच्याकडे लक्ष देत नव्हते. ते शिष्यगणही मजा बघत होते. हे पाहताच भगवान बुद्ध स्वतः पुढे झाले व त्यांनी वृद्धाच्या डोक्यावर टोपली उचलून दिली. त्या वृद्धाने त्यांना ओळखले होते. तो म्हणाला, ''साऱ्या जगाच्या दृष्टीने ते कोणीही असोत, पण माझ्या दृष्टीने माझ्या मुलासारखे आहेत! त्याचे बोलणे ऐकून शिष्य आश्चर्यचकित झाले.'' त्यांनी विचारले, ''हे कसे शक्य आहे? तो वृद्ध उत्तरला, जगात प्रत्येक मुलगा हा आपल्या मातापित्यांचा आधार असतो. त्यांचे कष्ट उपसण्यास नेहमीच मदत करत असतो. आज त्यांनीही मला मदत केली आहे. माझे कष्ट हलके केले आहेत. मग ते माझ्या मुलासमानच नाहीत का? साऱ्या शिष्यांनी त्या वृद्धाचे पाय धरले व क्षमा मागितली. **तात्पर्य : जे काहीही अपेक्षा न ठेवता इतरांना मदत करतात, तीच खरी मदत होय.**

## जन्म हा अखेरचा

# धर्माचारस्थल -१



स्त्रीच्या मोहासाठी देखील हिंसा केली जाते. यज्ञवेदीतील पशूहिंसेसंबंधी प्राचीन काळी मजेशीर प्रश्न विचारला गेला, ''यज्ञात तुम्ही पशुबळी दिल्यावर तुम्हांला स्वर्ग मिळेल, परंतु बळी गेलेल्या बिचाऱ्या पशूला कोणती गती मिळेल?''

''त्याला देखील स्वर्ग मिळेल.'' यज्ञकर्त्याने उत्तर दिले. पुढे त्या चाणाक्ष प्रश्नकर्त्याने विचारले, ''मुक्या पशूचा बळी दिल्यावर जर त्याला स्वर्ग मिळतो तर मग तुमच्या घरात बायको-मुले आहेत, त्यांची यज्ञात आहुती का देत नाही? त्या पशूप्रमाणेच त्यांनाही सहज स्वर्गप्राप्ती होईल.'' स्वर्ग इत्यादी पारलौकिक सुखांच्या मोहामुळे देखील हिंसा केली जाते. म्हणून लोभ, क्रोध आणि मोह ही हिंसेची तीन कारणे होत. अशाप्रकारे हिंसेचे ऐंशी प्रकार सांगितले आहेत. हिंसा हा शब्द ऐकायला आणि वाचायला एक असला तरी त्याचे प्रकार अनेक आहेत.

**(क्रमश:) - काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

## जनमानस

# मतभेद विसरावेत



महागाई, बेकारी, घसरणारा शेअर बाजार व अर्थव्यवस्था, त्यातून मुसळधार पाऊस, दिवाळी कशी साजरी करणार? राज्याची प्रगती व्हावी ही इच्छा पूर्ण करण्यासाठी मतदान करतात. नंतर सुरू असणारे राजकारण हैराण करणारे असते. कोणाची वाटचाल कठीण यापेक्षा सर्वसामान्य जनतेचा वाटचाल सुखकर होईल का? राजकीय पक्षांनी मतभेद विसरून राज्याच्या प्रगतीसाठी एकत्रित येऊन प्रयत्न करावेत असे वाटते.

**- प्र. मु. काळे, नाशिक.**

# माळरानावर हिरवाई फुलवणाऱ्या नीताकाकू

**मोहोळ तालुक्यातील अंकोलीच्या माळरानावर विकासाची हिरवाई फुलवणाऱ्या नीता सुनील कुलकर्णी यांच्या एकसष्टीनिमित्त आज पुण्यात विशेष सोहळा होत आहे. त्यानिमित्त त्यांच्या कार्यावर दृष्टिक्षेप टाकणारा हा शब्दप्रपंच...**

मुंबईसारख्या महानगरातून आधी अकोला, सोलापूर ते थेट अंकोलीचं माळरान असा आयुष्याचा प्रवास केलेल्या नीता सुनील कुलकर्णी हे जितकं करारी, तितकंच लोभस व्यक्तिमत्व. मोहोळ तालुक्यातील अंकोली इथं ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी एमएससीईटीचे सेंटर, स्पर्धा परीक्षा केंद्र, लोकसेवा रुग्णालय, करियर अकादमी आणि क्रीडा संकूल असा प्रचंड मोठा व्याप त्या सांभाळत आहेत. त्यांचे पती डॉ. सुनील कुलकर्णी आणि दीर डॉ. रवींद्र कुलकर्णी यांचं त्यांना मार्गदर्शन आहेच. तरीही हा प्रवास सोपा नव्हता आणि नाही. अंकोली आणि कुंभारीतील डॉ. रवींद्र श्रीपाद कुलकर्णी मदतनिधी ट्रस्टच्या व्यापक कार्याला साधारण वीसेक वर्षांपूर्वी त्यांनी सुरूवात केली. २००२-२००३चा तो काळ सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळाचा. सलग तीन वर्षे पाऊस न पडल्याने पाणी होते ते फक्त लोकांच्या डोळ्यातच. अशा आव्हानात्मक परिस्थितीत नीता कुलकर्णींनी कंबर कसली आणि थोड्याच काळात अंकोली परिसरात नीताकाकू म्हणून त्या सर्वपरिचित झाल्या.

त्या मूळच्या मुंबईच्या. चेंबूरच्या सरस्वती प्रशालेत आणि सोमैय्या कॉलेजात त्यांचे शिक्षण झाले. त्या काळात त्यांना नाटकाची खूप आवड होती, ज्योती दाभोळकर या त्यांच्या मैत्रिणीने त्यांना नाट्यक्षेत्रात आणले. बर्मा सेलच्या नेव्हल डेपोमध्ये आर्टिस्ट म्हणून नोकरीची संधीही तेव्हा ॲडमिरल आवटींनी उपलब्ध करून दिली. विविध एकांकिका, नाट्य स्पर्धांमध्ये त्या सहभागी झाल्या. संगीत नाटकांत भूमिका केल्या. त्यांच्या संस्थेला पारितोषिकेही मिळाली. लगेचच त्यांना दूरदर्शनवर संधी मिळाली. 'ज्ञानदीप,' 'कामगार विश्व' अशा कार्यक्रमांत माझा सहभाग होता. अगदी विवाह ठरल्यावरही त्यांचे काही कार्यक्रम दूरदर्शनवर झाले.

२००३ साली नीताकाकू सोलापूरला आल्या. डॉ. सुनील आणि डॉ. रवींद्र यांनी तसा निर्णय घेतला. अंकोलीचे काम पुढे नेण्यासाठी त्या धडाडीने कामाला लागल्या. अंकोलीत सुरूवात झाली ती दुष्काळाला तोंड देऊनच! त्या म्हणाल्या, अंकोलीत पाण्याचे दुर्भिक्ष्य होतेच. त्यात सलग तीन वर्षे पाऊस कमी झालेला. टँकरने पाणी आणले, ते जवळपासच्या गावकऱ्यांनाही उपलब्ध करून दिले. बोअर घेतल्या होत्या, तेव्हा फक्त आमच्याकडेच पाणी होते. तेही लोकांना गरजेनुसार उपलब्ध करून दिले. दुष्काळाची वर्षे सरली. इथे वीजजोडणी करून घेतली आणि थेट कामाला जुंपून घेतले. आईने (शकुंतला मराठे) कष्टाची आणि वडिलांनी (कमलाकर) स्वावलंबनाची सवय लावली होती. सर्वात आधी श्रीरामाची स्थापना केली. अतिशय देखण्या श्रीराम, लक्ष्मण, सीता आणि हनुमंताच्या दर्शनाने मन प्रसन्न होऊन जाते. त्यानंतर वृक्षलागवड सुरू केली. दवाखानाही वाढवला. रोज ७० ते ८० रुग्ण उपचारासाठी येत. अनेक महिला रुग्णांना त्या गाडीतून आणे आणि परत नेऊन सोडे. नीताकाकूंचा स्वभाव धाडसी.



समाजसेवेची तळमळ यामुळे अंकोलीत अल्पावधीतच त्यांचा लौकिक वाढला. तिथे त्यांनी लिंबाची बाग लावली. आरंभी डाळिंबाची बाग होती. सीताफळ, आवळा, आंबा, चिकू, चिंचेची झाडे लावली. शेतातल्या कामासाठी त्या स्वतः अन्य महिलांसमवेत हातात खुरपं घेऊन काम करीत. गावासाठी काहीतरी केले पाहिजे ही तळमळ तर होतीच. म्हणून ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी एमएच-सीईटीचे सेंटर त्यांनी आणले. सुरूवातीला त्याला विरोध करण्याचा प्रयत्न केला गेला, पण त्यावर मात करून नीताकाकूंनी शंभर-दीडशे मुलांच्या बॅचेस सुरू केल्या. मुलगा सुश्रुत आणि सून सायलीदेखील तिथं प्रशिक्षणासाठी मदत करीत. डॉ. सुनील यांचे मार्गदर्शन होतेच. अशा पद्धतीने सगळे कुलकर्णी कुटुंबच कामाला लागले. काकूंना या काळात पोलीस, तहसीलदार कार्यालय, एमएसईबी अशा अनेक सरकारी कार्यालयांमध्ये एकटीलाच जावे लागले.

२०१७ -१८ साली अंकोलीत लोकसेवा रुग्णालय सुरू झाले. त्यांची कन्या आणि जावई डॉक्टर आहेत. आता क्रीडासंकुलाची तयारी सुरू आहे. तिथे सैनिकी प्रशिक्षण देण्याचा मानस आहे. अंकोलीतील अनेक गावकऱ्यांची साथ आहे. लोक पाठीशी आहेत. अंकोलीतील शाळेलाही मोठी आर्थिक मदत दिली आहे. काकूंना तिथेही उमेदवारी देऊन राजकारणात येण्याचा आग्रह झाला, पण समाजसेवाच करण्याचे उद्दिष्ट्य डोळ्यापुढे ठेवून त्यांनी वाटचाल ठेवली आहे. डॉ. श्रीपाद यांच्यानंतर डॉ. रविंद्र आणि डॉ. सुनील यांच्या मार्गदर्शनाखाली नीताकाकूंचे काम सुरू आहे. अनेक संकल्प त्यांच्या मनात आहेत, अंकोलीचे माळरानावर लोकांच्या सेवेतून त्यांनी हिरवाई फुलवली आहे, यात शंका नाही.

**- प्रतिनिधी.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# 'चंद्रभागे'च्या आजी-माजी संचालकांच्याहस्ते विठ्ठल कारखान्याच्या साखर पोत्यांचे पूजन

**सुराज्य/पंढरपूर**

तालुक्यातील श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या सन२०२२- २३ चे गळीत हंगामामध्ये उत्पादित झालेल्या पहिल्या ११ साखर पोत्याचे पुजन चंद्रभागा सहकारी साखर कारखान्याचे संचालक इस्माईल मुलाणी, कालिदास पाटील, ज्ञानोबा कराळे, मधुकर नाईकनवरे, बिभिषण पवार, हनुमंत सुरवसे, बाळासाहेब कौलगे, आशिष यादव, दिनकरबापू कदम, दिनकर चव्हाण, पंढरीनाथ लामकाने, महादेव नाईकनवरे, नामदेव ताड, सुभाष भोसले, अँड. सारंग आराध्ये, एच.एम. बागल व भिमराव रोंगे यांचे शुभहस्ते व विठ्ठल चे अध्यक्ष अभिजीत आबा पाटील, मार्गदर्शक बब्रुवाहन रोंगेसर व व्हाईस चेअरमन सौ. प्रेमलता रोंगे यांचे प्रमुख उपस्थितीत झाला.



चेअरमन अभिजीत आबा पाटील म्हणाले की, कारखान्याकडे चालू गळीत हंगामासाठी ३५ हजार एकर क्षेत्राची ऊसाची नोंद झालेली असून त्यापासून अंदाजे १२ ते १५ लाख मे. टन गाळप होणार आहे. त्याकरिता कारखान्याने सक्षम ऊस तोडणी वाहतूक यंत्रणा उभी केलेली आहे. कारखान्याचे गाळप व्यवस्थितरित्या सुरु झाले आहे. निवडणूकीमध्ये वचन दिल्याप्रमाणे आतापर्यंत आम्ही सर्व दिलेल्या शब्दांचे पालन केलेले आहे व येथून पुढेही पालन करू. तसेच थकीत ऊस बील दिले व सभासदांची दिवाळी गोड व्हावी याकरिता बाहेरील कारखान्याची साखर उपलब्ध करून दिवाळी साखर वाटप ही केले. सभासदाच्या आर्शीवादांमुळे सत्तेवर आलेपासून अवघ्या १५ दिवसामध्ये कारखाना चालू केलेला आहे.

ऊस हंगाम सुरू असून शेतकऱ्यांना २५००रू. भाव देऊन ऊस कुठेही काटा करून आणावा असे जाहीर अवाहन देखील चेअरमन अभिजीत पाटील यांनी केले आहे. स्वागत व प्रस्ताविक प्र. कार्यकारी संचालक डी. आर. गायकवाड यांनी केले. याप्रसंगी कार्यलक्षी संचालक तुकाराम मस्के, माजी नगराध्यक्ष सुभाष भोसले, चंद्रभागा कारखान्याचे माजी संचालक इस्माईल मुलाणी, मधुकर नाईकनवरे, चंद्रभागा कारखान्याचे संचालक दिनकरबापू कदम,श्री किरण घोडके, श्री.लवटे, अँड. सारंग आराध्ये यांनी आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी संचालक सर्वश्री संभाजी भोसले, कालिदास पाटील, दिनकर चव्हाण, सुरेश मुसे, बाळासाहेब हाके, धनंजय काळे, साहेबराव नागणे, कालिदास साळुंखे, सचिन वाघाटे, जनक भोसले, प्रविण कोळेकर, नवनाथ नाईकनवरे, सिताराम गवळी, अशोक जाधव, सिध्देश्वर बंडगर, श्रीमती कलावती महादेव खटके, सविता विठ्ठल रणदिवे, तज्ञ संचालक सर्वश्री दशरथ जाधव, अशोक तोडले, तसेच प्र.कार्यकारी संचालक डी. आर. गायकवाड व सर्व अधिकारी, कर्मचारी वर्ग, कार्यकर्ते, सभासद व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### निवडणुकीत पाटील यांच्या भूमिकेकडे लक्ष

कारखाना चालवणारा माणूस म्हणून श्री विठ्ठल कारखाना दोन वर्षापासून बंद असलेला विठ्ठल कारखान्याचे यशस्वी गाळप सुरू देखील केले. चंद्रभागेच्या आजी माजी संचालकांच्या हस्ते विठ्ठलचे साखर पोती पूजन म्हणजे विठ्ठल जिंकला. आता चंद्रभागेच्या तयारी अशी चर्चा आता पंढरपूर तालुक्यात रंगताना दिसत आहे. विठ्ठल परिवारा मध्ये पंढरपूर तालुक्यात तीन साखर कारखाने असून चंद्रभागेची येत्या काही दिवसांत निवडणूकीचे बिगूल वाजणार आहे. तरी चेअरमन अभिजीत पाटील यांनी चंद्रभागेच्या संचालकांकडून विठ्ठल कारखान्याचे साखर पोती पूजन केल्याने वेगवेगळ्या चर्चेला उधाण आले आहे.

# दूध उत्पादकांना गाई, म्हशी खरेदीसाठी कर्ज उपलब्ध करून देणार

### चेअरमन रणजितसिंह शिंदे यांची माहिती

**सोलापूर :** दूध संघाची सर्व संकलन केंद्रे ऑनलाईन केली आहेत. त्याठिकाणी टेस्टिंग मशीन बसवल्यामुळे दूध उत्पादकांना आपल्या दुधाचे फॅट, एस. एन. एफ. व दुधाच्या किंमतीचा मेसेज मोबाईलवर मिळत आहे. या मशीनमुळे दुधात पाणी किती आहे ते कळत असल्याने संकलीत दुधाची गुणवत्ता चांगली होत आहे.

आण्णासाहेब पाटील व इतर मागासवर्गीय महामंडळामार्फत दूध उत्पादकांना नवीन गाई, म्हशी खरेदी करण्यासाठी कर्ज उपलब्ध करून दिले जाईल. त्या कर्जाचे हप्ते वेळेत भरल्यानंतर व्याजही कर्जदाराच्या खात्यात परत जमा होते, असे प्रतिपादन दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह शिंदे यांनी केले. आकुंभे येथे पाडव्याच्या शुभमुहूर्तावर आकुंभे वि. वि. का. सेवा सोसायटीच्या कार्यालयाचे व कामधेनू दुध उत्पादक संस्था या सोलापूर जिल्हा दूध संघाच्या डेअरीचे उद्‌घाटन केल्यावर शिंदे बोलत होते. यावेळी त्यांनी पालवन, आहेरगाव, भेंड, वरवडे परिसरातील सर्व गावकऱ्यांनी जिल्हा दूध संघाचे संकलन वाढण्यासाठी गाव तिथे डेअरी सुरू करून सहकार्य करावे, असे आवाहन केले.यावेळी बाळासाहेब पाटील, पप्पू कदम, पालवणचे परमेश्वर पाटील, लक्ष्मण कदम, जगन्नाथ कदम, विठ्ठल कदम, ग्रामपंचायत सदस्य शिवाजी भारती, प्रताप कदम, आहेरगावचे बाळासाहेब जगताप, सिध्दाराम पवार, आकुंभे सोसायटीचे व कामधेनू दुध उत्पादक संस्थेचे चेअरमन तसेच कार्यक्रमाचे आयोजक डॉ. सुधीर भारती, शिवाजी जाधव, महादेव भांगे आदी उपस्थित होते.



# मानवतेचा धर्म निभावणे हीच खरी ईश्वर साधना : इंगळे महाराज

**सोलापूर :** आधुनिक युगातील तंत्रज्ञानाच्या आभासी जगतातील आनंद साजरा करण्यापेक्षा इतरांप्रती आपल्या मनात संवेदनेचा पाझर फुटणे हेच मानवता धर्माचे परमकर्तव्य व मानवी जीवनाची सार्थकता असल्याचे भावनिक उद्गगार अखिल भाविक वारकरी मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष ह.भ.प.सुधाकर महाराज इंगळे यांनी काढले. अखिल भाविक वारकरी मंडळ पंढरपूर विभाग व मंगळवेढा शहर तालुका यांच्यावतीने पंढरपूर तालुक्यातील मातोश्री वृध्दाश्रम गोपाळपूर येथे दिवाळी पाडवा व भाऊबीज सणानिमित्त वृध्द माता - पित्यांना फराळाचे वाटप करण्यात आले. यावेळी इंगळे महाराज बोलत होते. यावेळी अखिल भाविक वारकरी मंडळाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष ह.भ.प. भागवत महाराज चवरे, जिल्हाध्यक्ष पंढरपूर विभाग ह.भ.प. ज्ञानेश्वर भगरे, ह.भ.प.शंकर महाराज चव्हाण, ह.भ.प.नवनाथ महाराज मोरे, महिला आघाडी अध्यक्ष संगिता आवताडे, शब्दशिवार साहित्य संघाचे संपादिका कुमुदिना घुले, प्रगतशील बागायतदार सर्जे राव आवताडे, माजी सैनिक दयानंद गायकवाड, महेश वठारे, प्रतिक भगरे, शहराध्यक्ष अविनाश नांद्रेकर, अजय आदाटे, सचिन भोसले, निवेदक संतोष मिसाळ, सप्तश्री घुले, सार्थक पवार आदीजण उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जेष्ठ स्तंभलेखक भिमराव मोरे यांनी केले तर सूत्रसंचालन संतोष मिसाळ यांनी केले.

# बार्शी येथे मंदिरात चोरी करण्याचा प्रयत्न

**बार्शी :** येथील दत्त नगरात असलेल्या समर्थ गणेश मंदिराच्या मुख्य दरवाजाचे कुलूप तोडून चोरी करण्याचा प्रयत्न केल्याची घटना गुरुवारी पहाटेच्या सुमारास उघडकीस आली. या प्रकरणात शंकर अर्जुन निकम (वय ३० रा.विठ्ठलनगर, बार्शी) याला पकडून पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले. तो गुरुवारी पहाटे दोन वाजेच्या सुमारास मंदिरात चोरी करण्याचा प्रयत्न केला. अशा आशयाची फिर्याद प्रदीप लक्ष्मण माने ( रा.दत्तनगर बार्शी) यांनी पोलिसात दाखल केली. सहाय्यक फौजदार वरपे पुढील तपास करीत आहेत.

# योग्य भाव देणारा एक नंबरचा कारखाना म्हणजे जयहिंद शुगर

### डॉ.महास्वामी यांचे प्रतिपादन



**अक्कलकोट :** दररोज एक लाख लिटर इथेनॉल निर्मिती तर रोज ३६ मेगावॉट वीज निर्मिती करुन शेतकर्यांच्या उसाला योग्य भाव देणारा जिल्ह्यातील एक नंबरचा मालकी कारखाना म्हणजे जयहिंद शुगर कारखाना असल्याचे मत खासदार डॉ.जयसिध्देश्वर महास्वामी यांनी येथे बोलताना व्यक्त केले.

आचेगाव (ता दक्षिण सोलापूर) येथे दीपावली पाडव्याच्या शुभ मुहूर्तावर जयहिंद शुगर कारखान्याच्या ८ व्या गळीत हंगामाचा शुभारंभ करताना खासदार डॉ. जयसिध्देश्वर महास्वामी हे बोलत होते.लिंबीचिंचोळी येथील बसवराज पाटील व गौडगांव येथील मोहन पाटील या शेतकरी दांपत्य व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते मोळी पूजन व बसवराज शास्त्री यांच्या मंत्रोच्चाराने कार्यक्रम झाला. यावेळी चेअरमन गणेश माने-देशमुख,उस्मानाबाद जिल्ह्याचे भाजपचे जिल्हा अध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी,बाबासाहेब माने-देशमुख, मुख्य व्यवस्थापक बब्रुवान माने-देशमुख, व्हाईस चेअरमन विक्रमसिंह पाटील, शालिवाहन माने-देशमुख, आचेगावचे सरपंच रमेश क्षीरसागर आदी मान्यवर उपस्थित होते. चेअरमन गणेश माने-देशमुख यांनी भगवदगीतेतील श्लोक सांगत इडा पिडा टळो, बळीचे राज्य येवो, अशी इच्छा व्यक्त केली. पावसामुळे गळीत हंगामाला उशीर झाला असला तरी कारखाना अधिकारी व कर्मचारी यांच्या कठीण परिश्रमामुळे यंदा १५ लाख मेट्रीक टन उस गाळपाचे उद्दिष्ट साध्य करणारच असल्याचे सांगितले. यावेळी उस्मानाबाद जिल्ह्याचे भाजपचे अध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांनीही मार्गदर्शन केले. यावेळी शेतकी अधिकारी चंद्रशेखर जेऊरे, चीप इंजिनिअर सिध्देश्वर उमरदंड, समन्वयक अमोल जगताप, चीप केमिस्ट अवताडे, डिस्लरी मॅनेजर श्रीकांत झोरी, केनयार्ड सुपरवायझर सिध्देश्वर पाटील तसेच मालक, ऊस टोळी मुकादम यांच्यासह सभासद उपस्थित होते.

# समाधान नगरात घरफोडी; ५१ हजारांचा ऐवज केला लंपास

**सोलापूर :** अज्ञात चोरट्याने घराचा कडी-कोंडा तोडून रोख रक्कमसह सोन्याचे दागिने असा एकूण ५१ हजारांचा ऐवज चोरून नेल्याची घटना दि.२७ ते २८ ऑक्टोंबर दरम्यान समाधान नगर अक्कलकोट रोड येथे घडली.

याप्रकरणी रसूलसाब हुसेनसाब पटेल (वय-२५,रा. समाधान नगर यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पटेल हे सासरी समाधान नगर येथे गेले होते.त्यावेळी त्यांच्या घराशेजारी राहणारे सद्दाम नदाफ यांनी त्यांच्या घरी चोरी झाल्याची माहिती दिली. चोरट्याने गुरव्या संगव्या मठ यांच्याही घराचा कडी-कोंडा उचकटून सोन्याचे दागिने चोरून नेले आहे.असे फिर्यादीत म्हटले आहे.

# कुमठानाका परिसरात चाकूने मारहाण; दोघे जखमी




**सोलापूर :** कुमठा नाका परिसरात अज्ञात कारणावरून चाकूने केलेल्या मारहाणी शोभा सूर्यभान सूर्यवंशी (वय ६२) आणि गोविंद सूर्यभान सूर्यवंशी (वय ५०) हे दोघे जखमी झाले. ही घटना काल गुरुवारी रात्रीच्या सुमारास घडली. त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. विजय दत्ता कांबळे याने मारहाण केली. अशी नोंद सदर बाजार पोलिसात झाली आहे.

**वृध्द सासऱ्यास मारहाण**

सांगोला-सासूच्या नोकरीतून मिळालेले पैसे आम्हाला द्या, या कारणावरून काठी आणि लाथाबुक्याने मारहाण करून वृध्द सासऱ्यास जखमी करण्यात आले. ही घटना जवळा (ता.सांगोला) येथे घडली. दगडू आबा सुरवसे (वय ७० रा.जवळा) असे जखमी झालेल्या सासऱ्याचे नाव आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून त्यांची सून सारिका विशाल सुरवसे आणि उज्वला नितीन सुरवसे या दोघीवर सांगोल्याच्या पोलिसांनी गुन्हा दाखल केला.२३ ऑक्टोबर रोजी रात्रीच्या सुमारास या दोघींनी पैशाच्या कारणावरून त्यांना मारहाण केली. अशी नोंद पोलिसात झाली आहे.




# जैन सोशल ग्रुपच्यावतीने फराळाचे वाटप

**सोलापूर :** जैन सोशल ग्रुप सोलापूर सेंट्रल तर्फे लुई ब्रेल अंध विकास बहुउद्देशीय संस्था यांच्या अंध गरजू सदस्याना गुजराती मित्र मंडळ हॉल येथे गोरगरीब अंधजणाना दिवाळी फराळ व भेट वस्तूंचे वाटप करण्यात आले. यावेळी जैन सोशल ग्रुप सोलापूर सेंट्रलचे संस्थापक अध्यक्ष केतन शहा, अध्यक्ष संजय शहा, सचिव अशोक छाजेड,अतुल गांधी,जैन सोशल ग्रुपचे नितीन अवलानी, हेमाबेन अवलानी,जयश्री लोणावत,राहुल मुनोत, राजू वोरा, चंदुभाई देढिया सोलापूर सेंट्रलचे सर्व पदाधिकारी व सदस्य तसेच डॉ.नवनीत तोष्णीवाल, डॉ. अंजली कुरापाटी, सुदर्शन कुरापाटी, पुनम इटकरे, अश्विनी रणदिवे, निलीमा ढालजी, सुरज सोनटक्के, महासचिव, संतोष देशमुख, कोषाध्यक्ष, महेश बिराजदार आदी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी,रती सुरवसे, बसवेश्वर तोडकरी, कमलदिप हुंचीकट्टी, ब्रम्हदेव माने, गीतांजली यादव आदी परिश्रम घेतले. सुत्र संचलन संतोष देशमुख यांनी केले तर अभार गोहर पठाण यांनी मानले

# पैशांसाठी विवाहितेचा छळ; पतीसह सहाजणांवर गुन्हा

**सोलापूर :** बांधकाम व चार चाकी गाडी विकत घेण्यासाठी पाच लाख रुपये घेऊन ये नाहीतर तुला जिवंत सोडणार नाही असे म्हणत विवाहितेला उपाशी ठेवून तिचा मानसिक व शारीरिक छळ केल्याप्रकरणी सहा जणांविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना दि.३० जून २०१० पासुन ते २३ ऑगस्ट २०२२ पर्यंत घडली.याप्रकरणी रुकय्या अताउल्ला जालवाद (वय-३०,रा.स्वामी विवेकानंद नगर,हत्तुरे वस्ती) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून पती अताउल्ला जालवाद,सासु नजीरा जालवाद,सासरे मोहम्मद उमर मशाकसाब जालवाद,दिर अमानउल्लाह,सनाउल्लाह व अताउल्लाह यांची दुसरी पत्नी हलिमा जालवाद (सर्व.रा.बागलकोट) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

**घरासमोर लावलेली दुचाकी पळवली**

अज्ञात चोरट्याने घरासमोर पार्क केलेली दुचाकी क्रमांक एम.एच.१३. सीडब्लू.१८४८ ही चोरून नेली आहे.ही घटना दि.२३ ते २४ ऑक्टोंबर दरम्यान पश्चिम मंगळवार पेठ बाळवेस सोलापूर येथे घडली. याप्रकरणी रतिकांत रेवणसिद्ध खंदारे (वय-३९,रा.पश्चिम मंगळवार पेठ) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

# तांदुळवाडी व फळवणी येथे ऊसाने भरलेल्या वाहनांचे टायर फोडले; १ लाखांपेक्षा जास्त नुकसान

**सुराज्य/वेळापूर**

तांदुळवाडी व फळवणी तालुका माळशिरस येथे रात्रीच्या सुमारास अज्ञातांनी तीक्ष्ण हत्यार्याने टायर फोडून दोन वाहनांचे १ लाखा पेक्षा जास्त नुकसान केले आहे.

२७ रोजी रात्रीच्या १०.३० च्या सुमारास तांदुळवाडी ते साळमुख रोडवर नायरा पेट्रोल पंपाजवळ महिंद्रा अर्जुन ट्रॅक्टर एमएच १३ एजे २५ ६२ व ट्रेलर एमएच ४५ १४९२ ट्रेलर एम एस ४५ १४९३ हे उसाने भरलेले वाहन अकलूज येथील सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सहकारी साखर कारखान्याकडे जात असताना हे ऊसाचे वाहन नायर पंपाजवळ थांबवून ड्रायव्हर मालकाकडुन जेवणाचा डबा घेत असताना तांदुळवाडी गावाच्या दिशेने चार अनोळखी इसम युनिकॉर्न, स्प्लेंडर मोटरसायकल वरून येऊन तीक्ष्ण हत्यार्याने दोन्ही ट्रेलरची टायर फोडून ४५ हजार रुपयांचे नुकसान केले असल्याची फिर्याद सुरज बाळासाहेब कांबळे तांदुळवाडी यांनी वेळापूर पोलीस स्टेशनला दिली आहे. त्याचबरोबर त्याच रात्री ११.०० सुमारास फळवणी ते साळमुख रोडवर फळवणी कॅनाल जवळ संजय मोरे महुद यांचे ट्रॅक्टर वाहन माळीनगर साखर कारखान्याकडे जात असताना निरा कॅनाल फळवणी येथे अडवून ट्रॅक्टर व दोन्ही ट्रेलरची टायर फोडून दोन्ही वाहनांचे एक लाख रुपयांपेक्षा जास्त नुकसान झाले आहे. याचा अधिक तपास वेळापूर पोलीस स्टेशनचे उप सपोनी संजय राऊत हे अधिक तपास करीत आहेत.

### .... तर कारवाई करू : बागाव

जी वाहने ऊस वाहतूक करत आहेत त्यांनी रात्रीच्या सुमारास आपले वाहन कारखान्यावर जाईपर्यंत बरोबर वाहन मालकांनी संरक्षक माणसे घेऊन काळजी घ्यावी. वेळापूर पोलीस स्टेशन हद्दीत दसुर ते श्रीपुर वेळापूर व कोळेगाव ते फळवणी मळवली, वेळापूर, खंडाळी पर्यंत पोलीस कर्मचारी पोलीस वाहन हे रात्रभर पेट्रोलिंग करणार आहेत. जे कोणी वाहनांचे टायर फोडून कायदा हातात घेण्याचा प्रयत्न करतायेत अशावर वेळापूर पोलीस स्टेशनला गुन्हेे नोंदवून कारवाई केली जाणार आहे, असा इशारा वेळापूर पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी निलेश बागाव यांनी दिला आहे.



# मळोली येथे आनंदाचा शिधा वाटप

**वेळापूर :** मळोली (ता. माळशिरस) येथील स्वस्त धान्य दुकानाच्या वतिने महाराष्ट्र शासन यांचा आनंदाचा शिधा दिवाळीचे किट वाटप पं स सदस्य रणजितसिंह जाधव यांच्या हस्ते करण्यात आले .यावेळी मळोली ग्रामपंचायत उपसरपंच महादेव पवार, संतोष जाधव, विजय जाधव, शब्बीर मुजावर, मळोली विकास सेवा सोसायटीचे माजी चेअरमन शिवाजी नानासाहेब जाधव. तसेच सदस्य दत्तात्रय महाडिक, सुरेशदादा जाधव, अशोक वाघमारे, अनिल महाडिक, अरुण जाधव व लाभार्थी उपस्थित. होते.

# राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे ४ पासून शिर्डीत दोन दिवसीय शिबिराचे आयोजन : उमेश पाटील

**मोहोळ :** महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने ४ आणि ५ नोव्हेंबर रोजी शिर्डी येथे राज्यातील प्रमुख कार्यकर्त्यांसाठी राष्ट्रवादी मंथन : वेध भविष्याचा या दोन दिवसीय अभ्यास शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेश प्रवक्ते उमेश पाटील यांनी दिली


शिबिरामध्ये पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार, विधानसभेतील विरोधी पक्षनेते अजित पवार यांच्यासह पक्षाचे ज्येष्ठ नेते, राज्यातील विविध क्षेत्रातील विचारवंत, अभ्यासक मार्गदर्शन करणार आहेत. पक्षाच्यावतीने सभासद नोंदणी मोहीम मोठ्या प्रमाणावर राबवण्यात येत आहे. ही मोहीम गतिमान करून ग्रामीण तसेच शहरी भागात कार्यकर्त्यांचे मजबूत जाळे निर्माण करण्यात येत असून शिबिराच्या माध्यमातून या मोहिमेला चालना देण्यात येणार आहे. पक्षाच्या अंतर्गत काम करणा-या विविध संघटनांनी वेळोवेळी आपली भूमिका उत्तमपणे पार पाडली. त्याचमुळे महाराष्ट्रातील सुजाण आणि परिवर्तनशील जनतेने राष्ट्रवादी कॉंग्रेसला पाठबळ दिले. अलीकडच्या काळामध्ये भक्कम संघटनात्मक बांधणीसाठी प्रयत्न करणारा राष्ट्रवादी काँग्रेस हा एकमेव पक्ष आहे, असे उमेश पाटील म्हणाले



जनतेच्या अशा पाठबळामुळेच आजवरच्या २३ वर्षांच्या प्रवासातील साडेसतरा वर्षे पक्ष राज्याच्या सत्तेमध्ये राहिला. पवार साहेबांनी सातत्याने केलेली विचारांची पेरणी आणि दुस-या फळीतील नेत्यांनी केलेली मशागत यामुळे प्रत्येक आघाडीवर पक्षाने अग्रभागी राहून आपली भूमिका बजावली. समविचारी पक्षांना सोबत घेऊन वैचारिक लढाई लढली. हीच परंपरा अधिक व्यापक आणि गतिमान करण्यासाठी शिर्डी येथे 'राष्ट्रवादी मंथन : वेध भविष्याचा' या अभ्यास शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. आज समाजामध्ये फूट पाडण्याचे तसेच विद्वेष निर्माण करण्याचे काम सत्तेच्या माध्यमातून केले जात आहे. घटनात्मक संस्थांचे खच्चीकरण करण्याची मोहीम राबवली जात आहे. लोकशाही पद्धतीने आवाज उठवणा-या विद्यार्थ्यांपासून अभ्यासकांपर्यंतच्या विविध घटकांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न सुरू आहे. अनेक पातळ्यांवरचे अपयश लपवण्यासाठी धार्मिक मुद्द्यांच्या आड लपण्याचा प्रयत्न केला जात आहे. देशासमोर, राज्यासमोर अनेक प्रश्न असताना व्हाट्सअप युनिव्हर्सिटीच्या माध्यमातून चुकीची माहिती प्रसारित करून लोकांना संभ्रमित करण्याचे प्रयत्न सत्ताधा-यांकडून केले जातात. या पार्श्वभूमीवर विविध प्रश्नांसंदर्भातील नेमके वास्तव काय आहे, त्यासंदर्भातील नेमकी आव्हाने कोणती आहेत आणि त्यांना सामोरे कसे जाता येईल यासंदर्भातील मंथन शिबिरामध्ये करण्यात येणार आहे. बदलत्या काळाची गरज ओळखून पक्षाचा डिजिटल चेहरा अधिक प्रभावी बनवण्यात येत आहे. पक्षाच्या प्रमुख नेत्यांबरोबरच विविध क्षेत्रातील अभ्यासक, विचारवंत, पत्रकार विविध विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत. दोन दिवसांचे हे शिबिर पक्षाच्या निमंत्रित पदाधिका-यांसाठी आहे असेही पाटील यांनी आवर्जून सांगितले.

### अप्पादेव जोशी यांचे निधन

**सोलापूर :** भंडारकवठेचे रहिवासी तथा पुरोहित तथा वेदशास्त्रसंपन्न मेघ:शाम नरहर जोशी उर्फ अप्पादेव (वय ८४) यांचे बुधवारी निधन झाले.




त्यांच्या पश्चात एक मुलगा, तीन मुली व नातवंडे, असा परिवार आहे. विद्यार्थी दशेत मुलांवर संस्कार घडावेत म्हणून त्यांनी एवढे तरी पाठ करा हे सात वारांच्या श्लोकांचे पुस्तक लिहिले होते. गणेशआख्यानसुधा हा ग्रंथही त्यांनी लिहिला आहे. कमलात्मज या टोपण नावाने त्यांचा काव्यसंग्रह देखील आहे.


### दारफळे यांचे निधन

**सोलापूर :** सोलापूर महापालिका विभागीय कार्यालय क्रमांक ५ मधील कनिष्ठ लिपिक मल्लिनाथ सिद्रामप्पा दारफळे यांचे गुरुवार दिनांक २८ ऑक्टोबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. ते ५२ वर्षांचे होते.



त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, भाऊ असा परिवार आहे.



## पावसात वाहून गेला आजचा दिवस

# अफगाणिस्तान-आयर्लंड आणि इंग्लंड-ऑस्ट्रेलिया सामना रद्द

✔ सुराज्य/मेलबर्न

टी२० विश्वचषक २०२२ स्पर्धेत यंदा ऑस्ट्रेलियात सुरु असून स्पर्धेत अनेक आश्चर्यकारक निर्णय लागत असून पावसाच्या व्यत्ययामुळेही गुणतालिकेत बदल होत आहेत. आज विश्वचषक स्पर्धेत ग्रुप १ मधील अफगाणिस्तान विरुद्ध आयर्लंड आणि इंग्लंड विरुद्ध ऑस्ट्रेलिया असे दोन सामने रंगणार होते.

पण मेलबर्नमध्ये होणाऱ्या तुफान पावसामुळे दोन्ही सामने रद्द करण्यात आले आहेत. त्यामुळे आज एकही विश्वचषकाचा सामना खेळवला गेला नाही. त्यात साखळी सामन्यांसाठी अधिकचा दिवस नसल्याने सामना रद्द झालेल्या संघाना एक-एक गुण देण्यात आला आहे. दरम्यान आजही दोन सामने रद्द झाल्याने इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, आयर्लंड आणि अफगाणिस्तान या चारही संघाना एक-एक गुण देण्यात आला. अफगाणिस्तान आणि आयर्लंड तसंच इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात सामना रंगणार होता.

| | TEAMS | M | W | L | T | N/R | PT | NRR |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | NEW ZEALAND | 2 | 1 | 0 | 0 | 1 | 3 | 4.450 |
| 2 | ENGLAND | 3 | 1 | 1 | 0 | 1 | 3 | 0.239 |
| 3 | IRELAND | 3 | 1 | 1 | 0 | 1 | 3 | -1.169 |
| 4 | AUSTRALIA | 3 | 1 | 1 | 0 | 1 | 3 | -1.555 |
| 5 | SRI LANKA | 2 | 1 | 1 | 0 | 0 | 2 | 0.450 |
| 6 | AFGHANISTAN | 3 | 0 | 1 | 0 | 2 | 2 | -0.620 |

| | TEAMS | M | W | L | T | N/R | PT | NRR |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | INDIA | 2 | 2 | 0 | 0 | 0 | 4 | 1.425 |
| 2 | SOUTH AFRICA | 2 | 1 | 0 | 0 | 1 | 3 | 5.200 |
| 3 | ZIMBABWE | 2 | 1 | 0 | 0 | 1 | 3 | 0.050 |
| 4 | BANGLADESH | 2 | 1 | 1 | 0 | 0 | 2 | -2.375 |
| 5 | PAKISTAN | 2 | 0 | 2 | 0 | 0 | 0 | -0.050 |
| 6 | NETHERLANDS | 2 | 0 | 2 | 0 | 0 | 0 | -1.625 |

आधी अफगाणिस्तान-आयर्लंड सामना पावसामुळे रद्द झाला. ज्यानंतर इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया हा सामना दोन्ही संघासाठी सेमीफायनलमध्ये एन्ट्रीसाठी अत्यंत महत्त्वाचा होता. दोघांनाही यंदा नावाला साजेशी कामगिरी करता न आल्याने आज विजय मिळवणारा संघ गुणतालिकेत वरचढ होणार होता. पण सामनाच रद्द झाल्याने दोघांना एक-एक गुण देण्यात आला.

# शोएब अख्तर म्हणाला, पुढच्या आठवड्यात भारतही स्पर्धेबाहेर होणार

## प्रतिक्रियेनंतर सोशल मिडीयावर होतोय ट्रोल

✔ **नवी दिल्ली** : टी२० विश्वचषक २०२२ स्पर्धेत अगदी रोमहर्षक सामने होताना दिसत आहेत. भारताने सलामीच्या सामन्यात पाकिस्तानवर विजय मिळवला, मग नेदरलँडलाही मात देत अव्वलस्थान गाठलं आहे. पण पाकिस्तान मात्र आधी भारताकडून मग झिम्बाब्वेकडून पराभूत झाला होत थेट पाचव्या स्थानी गेला आहे.

या पाकिस्तानचे पराभव माजी खेळाडू शोएब अख्तरला चांगलेच झोंबले असून त्याने भारतावर निशाणा साधत, 'पाकिस्तान आता स्पर्धेबाहेर जाणार असेल तर भारतही सेमीफायनलपर्यंतच पोहोचेल आणि पुढच्या आठवड्यात पुन्हा घरी परतेल,' असं वक्तव्य केलं आहे.

ग्रुप १ मध्ये गुरुवारी २% ऑक्टोबर रोजी पाकिस्तान आणि झिम्बाब्वे यांच्यात झालेल्या सामन्यात झिम्बाब्वेने पाकिस्तानचा १ धावाने पराभव केला आणि ऐतिहासिक विजय मिळवला. त्याचबरोबर पाकिस्तानच्या या



पराभवानंतर अनेक माजी दिग्गज चांगलेच नाराज आहेत. शोएब अख्तरने देखील या पराभवानंतर टीम इंडियाविरुद्ध बोलताना, ''मी आधीच सांगितले आहे की पाकिस्तान या आठवड्यात वर्ल्डकपमधून बाहेर पडेल आणि मग टीम इंडिया पुढील आठवड्यात सेमीफायनलचा सामना खेळून स्पर्धेबाहेर पडेल. भारतही काही खूप भारी संघ नाहीये.'' विशेष म्हणजे भारत सध्यातरी विश्वचषक स्पर्धेत दमदार कामगिरी करताना दिसत आहे. आधी पाकिस्तानला ४ विकेट्सनी मात दिल्यानंतर दुसऱ्या सामन्यात नेदरलँडवरही भारतने ५६ धावांनी विजय मिळवला आहे. आता भारताचा पुढील सामना रविवारी दक्षिण आफ्रिकेविरुद्ध असणार आहे. ग्रुप-२ पॉईंट्स टेबल : ग्रुप-२ चा विचार केल्यास भारत आणि दक्षिण आफ्रिका पहिल्या दोन स्थानांवर आहेत. पाकिस्तानचा संघही टॉपवर असेल असे वाटत होते पण सलग दोन सामने गमावल्यानने ते थेट पाचव्या स्थानावर आहेत. झिम्बाब्वे आणि बांग्लादेशचा संघ तिसऱ्या आणि चौथ्या स्थानावर आहे.

# बीसीसीआयची घोषणा, पुरुष आणि महिला खेळाडूंना मिळणार समान मानधन


✔ **मुंबई** : भारतीय महिला क्रिकेटर्सनी नुकतच आशिया कप २०२२ वर नाव कोरलं. मागील काही काळात भारतीय महिलांनी त्यांच्या खेळात केलेल्या कमाल सुधारणेनंतर आता जागतिक महिला क्रिकेटमध्ये भारताचा दबदबाही दिसून येत आहे. ज्यानंतर आता बीसीसीआयनंही एक मोठं पाऊल उचलत पुरुष क्रिकेटर्सप्रमाणेच महिला क्रिकेटर्सनाही समान मानधन मिळणार असल्याची घोषणा केली आहे. बीसीसीआय सचिव जय शाहा यांनी ही मोठी घोषणा केली आहे.

ज्यानुसार आता कसोटी सामन्यांसाठी १५ लाख, वनडेसाठी ६ लाख तर टी-२० सामन्यांसाठी ३ लाख खेळाडूंना मिळणार आहेत. जय शहा यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून या ऐतिहासिक निर्णयाची घोषणा केली. स्त्री-पुरुष भेदभाव दूर करण्यासाठी बीसीसीआयनं पहिलं पाऊल उचललं आहे, हे सांगताना आनंद होत असल्याचंगी जय शाह यांनी म्हटलं आहे. आम्ही आमच्या करारबद्ध महिला क्रिकेटपटूंसाठी वेतन समानता धोरण लागू करत आहोत, असंही ते म्हणाले.

**काय म्हणाले जय शाह?**

बीसीसीआय सचिव जय शाह यांनी बोलताना सांगितलं की, आपण आता लैंगिक समानतेच्या एका नव्या युगात प्रवेश करतोय. अशा परिस्थितीत या धोरणांतर्गत आतापासून पुरुष आणि महिला दोघांसाठी समान मॅच फी असेल.

# विराटची टी-२० रँकिंगमध्ये झेप.. टॉप-१० मध्ये मिळवलं स्थान



✔ **मेलबर्न** : आयसीसी टी-२० विश्वचषकाच्या पहिल्या सामन्यात भारताचा स्टार फलंदाज विराट कोहलींनं पाकिस्तानविरुद्ध दमदार फलंदाजी केली. या सामन्यात विराटनं अवघ्या ५३ चेंडूत नाबाद ८२ धावांची खेळी करत भारताला विजय मिळवून दिला, ज्याचा फायदा त्याला आयसीसी टी-२० क्रमवारीत झालाय. आयसीसीनं जाहीर केलेल्या ताज्या टी-२० क्रमवारीत विराट कोहलींनं थेट नवव्या स्थानावर झेप घेतली आहे. तर, भारताविरुद्ध गोल्डन डकचा शिकार ठरलेला पाकिस्तानचा कर्णधार बाबर आझमचं मोठं नुकसान झालं असून त्याची चौथ्या स्थानावर घसरण झालीय.

# पाकिस्तान संघाचे यंदा वर्ल्डकपच्या सेमीफायनलमध्ये पोहोचणे भारताच्या हातात



✔ **मेलबर्न** : सध्या टी२० क्रिकेटमध्ये एक अव्वल दर्जाचा बोलिंग अटॅक असूनही पाकिस्तान संघाला टी२० विश्वचषक स्पर्धेत खास कामगिरी करता आलेली नाही. आधी भारत आणि मग झिम्बाब्वे अशा दोन्ही संघाकडून पाकिस्तानला पराभव पत्करावा लागला आहे.

त्यामुळे ग्रुप १ च्या पॉईंट्स टेबलमध्येही पाकिस्तान ६ पैकी ५ व्या स्थानावर आहे. त्यामुळे पाकिस्तान सेमीफायनलमध्ये पोहोचणं तसं अवघडचं आहे. पण असं असलं तरी पाकिस्तानचं सेमीफायनलमध्ये पोहोचणं अजूनही शक्य आहे. पाकिस्तान सेमीफायनलमध्ये पोहोचण्यासाठी त्यांना त्यांचे उर्वरीत सामने अगदी मोठ्या फरकाने जिंकावे लागतील. ज्याने त्यांचा नेट रनरेट वाढेल. तसंच भारताशिवाय ग्रुप १ मधील इतर संघानी खराब कामगिरी केल्यास पाकिस्तानला फायदा होईल.

सर्वात आधी भारताला दक्षिण आफ्रिकेसह इतर सर्व सामने जिंकावे लागतील. तसंच बांग्लादेशला एक आणि झिम्बाब्वेसह दक्षिण आफ्रिकेला किमान दोन सामने गमावावे लागतील आणि असं सर्व झाल्यास पाकिस्तानचे सेमीफायनलमध्ये पोहोचण्याचे चान्सेस आहेत.

# झिम्बाब्वेने केला बलाढ्य पाकिस्तानचा पराभव

## टी-२० विश्वचषकात मोठा उलटफेर; पराभव पाकिस्तानी खेळाडूंच्या जिव्हारी लागला

✔ सुराज्य/पर्थ

पाकिस्तानविरुद्ध थरारक सामन्यात झिम्बावेच्या संघानं अवघ्या एका धावेनं विजय मिळवलाय. पर्थ स्टेडियमवर खेळण्यात आलेल्या या सामन्यात झिम्बाब्वेच्या संघानं पाकिस्तानसमोर १३१ धावांचं लक्ष्य ठेवलं. या लक्ष्याचा पाठलाग करताना पाकिस्तानच्या संघाची दमछाक झाली. अखेरच्या षटकात पाकिस्तानच्या संघाला ११ धावांची आवश्यकता वेगवान गोलंदाज ब्रॅड इव्हान्सनं भेदक गोलंदाजी करत झिम्बाब्वेच्या संघाला विजय मिळवून दिला.

या पराभवानंतर पाकिस्तानचा संघ कर्णधार बाबर आझम आणि सलामीवीर मोहम्मद रिझवान यांच्यावर पूर्णपणे अवलंबून असल्याचं चित्र पुन्हा एकदा पाहायला मिळालं. सध्या टी२० क्रिकेटमध्ये एक अव्वल दर्जाचा बोलिंग अटॅक असूनही पाकिस्तान संघाला टी२० विश्वचषक स्पर्धेत खास कामगिरी करता आलेली नाही.

या सामन्यात नाणेफेक जिंकून झिम्बाब्वेच्या संघानं पाकिस्तानच्या संघाला प्रथम गोलंदाजी करण्याचं आमंत्रण दिलं. त्यानंतर फलंदाजी करण्यासाठी मैदानात आलेल्या झिम्बाब्वेच्या संघानं निर्धारित २० षटकात आठ विकेट्स गमावून पाकिस्तानसमोर १३१ धावांचं लक्ष्य ठेवलं. झिम्बाब्वेकडून सेन विल्यम्सनं सर्वाधिक ३१ धावांची



खेळी केली.पाकिस्तानकडून मोहम्मद वसीम ज्युनिअर उत्कृष्ट गोलंदाजी केली. त्यानं या सामन्यातील चार षटकात २४ धावा खर्च करून सर्वाधिक चार विकेट्स घेतल्या. त्यानंतर शादाब खाननं तीन विकेट्स घेतल्या. तर, हारिफ रौफच्या खात्यात एक विकेट्स जमा झाली.

### अवघ्या धावेनं विजय

१३१ धावांचं लक्ष्य रोखण्यासाठी मैदानात उतरलेल्या झिम्बाब्वेच्या संघानं पाकिस्तानच्या नाकी नऊ आणले. बाबर आझम आणि रिझवान लवकर बाद झाल्यानंतर पाकिस्तानचा संघ स्वतःला सावरू शकला नाही. अखेरच्या षटकात ११ धावांची गरज असताना पाकिस्तानच्या संघाला अवघ्या एका धावेनं पराभव स्वीकारावा लागला. या स्पर्धेतील सलग दुसऱ्या पराभवामुळं पाकिस्तानची टी-२० विश्वचषकातून बाहेर पडण्याची शक्यता वाढलीय.

### सिकंदर रझा सामनावीर

पाकिस्तानविरुद्ध उत्कृष्ट गोलंदाजी करणाऱ्या सिंकदर रझाला सामनावीर म्हणून गौरवण्यात आलं. या सामन्यात सिकंदर रझानं चार षटकात २५ धावा खर्च देऊन तीन विकेट्स घेतल्या. तर, ब्रॅड इव्हंसच्या खात्यात दोन विकेट्स जमा झाल्या. याशिवाय, मुझारबनी आणि जोन्वे यांना प्रत्येकी एक-एक विकेट्स मिळाली.





## घुंगरेगावात एसटीची सेवा सुरू

**सुराज्य/अक्कलकोट** : अक्कलकोट तालुक्यातील घुंगरेगावातील ग्रामस्थांसाठी यंदाची दिवाळी आगळी वेगळी ठरली. सोलापूरचे खासदार श्री ष. ब्र. डॉ. जयसिध्देश्वर शिवाचार्य महास्वामीजींच्या पाठपुराव्यामुळे घुंगरेगावात एसटीची सेवा सुरू झाली आहे.

विशेष म्हणजे देश स्वातंत्र्य झाल्यानंतर प्रथमच या गावात लालपरी धावताना दिसल्याने ग्रामस्थांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत असून त्यांनी खासदार जयसिध्देश्वर शिवाचार्य महास्वामीजींचे आभार मानले आहेत. पाडव्याच्या शुभमुहूर्तावर जयसिध्देश्वर शिवाचार्य महास्वामीजींच्या अमृत हस्ते एस टी बससेवेचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी अक्कलकोट एसटी आगारप्रमुख रमेश म्हंता, शाखा उपअभियंता आर. डी. गायकवाड, रुद्रमुनी हिरेमठ, योगेश गवळी, स्टोअर इन्चार्ज अमर पाटील, वसंतकुमार तोटू नगल, अशोक रत्नाकर, शिवपाद किणगे, सरपंच श्रीशैल माने, श्रीकांत पवार, संतोष गुरव, तात्या पवार, राजू पाटील, मल्लिकार्जुन तामदंडी, समर्थ नागशेट्टी, नामदेव पवार, सिध्दप्पा पुजारी, मल्लिकार्जुन गुरव, विठ्ठल बिराजदार, शांतप्पा बनसोडे, परशुराम सुतार, भरत पवार, चालक, वाहक, आजी माजी सरपंच व ग्रामस्थ उपस्थित होते.

## किसनराव मुदगुल यांचे निधन



**सुराज्य/मंगळवेढा** : येथील किसनराव हनुमंता मुदगुल (विशेष कार्यकारी अधिकारी) वय वर्षे ८२ दि. २६ रोजी यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी जावई, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# गर्दीचा फायदा घेत सोन्याचे दागिने चोरणारी अट्टल महिला आरोपी अटकेत

**सुराज्य/सोलापूर**

**गर्दीचा फायदा घेऊन सोन्याचे दागिने चोरी करणारी अटल महिला आरोपीला अटक करून ५ लाख २९ हजार ६७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

सोलापूर बसस्थानकात प्रवाशांच्या सोन्याच्या दागिन्यांच्या चोरीत वाढ झाली होती. फौजदार चावडी पोलीस ठाण्याचे डीबी पथक महिला प्रवाशांना लुटणाऱ्या महिलेचा तपास करत होते. २१ ऑक्टोबर रोजी अश्विनी गोपाळ पाटील (वय-३४, रा. गणेश नगर, हैद्राबादरोड, सोलापूर) या दिवाळी निमित्ताने माहेरी जात होत्या. एसटी स्टॅण्डवर बोरवली बसमध्ये चढताना अज्ञात महिलेने गर्दीचा फायदा घेत धक्काबुक्की करत त्यांची सोन्याचे दागिने असलेली पर्स लंपास केली होती. याबाबत अश्विनी पाटील यांनी २१ ऑक्टोबर रोजी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवली.

सीसीटीव्ही फुटेज आणि खबऱ्याकडून मिळालेल्या माहितीनुसार २४ तासाच्या आत एका संशयीत महिलेस चोरलेले सोने विकण्यास येत असताना लक्ष्मी मंडईजवळ ताब्यात घेतले. आयेशा युसूफ शेख (वय-३३), रा. समाधान नगर, अक्कलकोट रोड सोलापूर) असे ताब्यात घेतलेल्या महिलेचे नाव होते. तिला ताब्यात घेतल्या नंतर तिने गुन्हा कबुल केला. फक्त एसटी बसेसमध्ये गर्दीचा फायदा घेत चोरी करत असल्याची माहिती तिने पोलिसांना दिली. पोलिसांनी तिच्याकडून एकूण साडेबारा तोळे वजनाचे ५ लाख २९ हजार ६७० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. सध्या ती न्यायालयीन कोठडीत असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

फौजदार चावडी पोलीस ठाण्याच्या डीबी पथकाने आयेशा शेख हिचा शोध लावला. हा शोध घेण्यासाठी पोलीस निरीक्षक उदयसिंह पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक शंकर धायगुडे, दुय्यम पोलीस निरीक्षक विकास देशमुख, पोलीस नाईक दीपक डोके, अय्यज बागलकोटे, धनंजय बाबर, रामा बाचावार, कृष्णा बडूरे, विनोद व्हटकर, नितीन मोरे, सचिनकुमार लवटे, अमोल खरटमल, अर्जुन गायकवाड, अजय चव्हाण, संतोष चानकोटी, शशिकांत दराडे, नागनाथ गुळवे, उमेश आचलारे आदींनी केली.

### अखेर तिने चोरीचा धंदा सुरू केला

आयेशा शेख ही अत्यंत गरीब परिस्थितीत हलाखीची जीवन जगत आहे. ६ अपत्य असल्याने त्यांना जगवायचे कसे हा प्रश्न तिच्या समोर पडला होता. त्यामुळे तिने अखेर चोरींचा धंदा सुरू केला. बुरखा घालून बसमध्ये चढण्यासारख नाटक करत होती. गर्दीचा फायदा घेत महिला प्रवाशांच्या पर्सवर डल्ला मारत होती, अशी माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक शंकर धायगुडे यांनी दिली.



## मधुकंस संगीत विद्यालयातर्फे उद्या संगीत सभेचे आयोजन

**सुराज्य/सोलापूर** : मधुकंस संगीत विद्यालयाच्या दुसऱ्या वर्धापन दिनानिमित्त येत्या रविवारी कर्णिक नगरच्या श्रीकृष्ण मंगल कार्यालयात सायंकाळी ६ वा. संगीत सभेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती संस्थेचे संचालक नितिन दिवाकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मधुकंस संगीत विद्यालय हे गेल्या दोन वर्षापासून सुरु असून कर्णिक नगर आणि एकतानगरच्या विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी कर्णिकनगर भागात दुसरी शाखा सुरु करण्यात आलेली आहे. या संस्थेचा दुसरा वर्धापन दिन याच भागात साजरा होणार असून यात सात्विकी गड्डम यांचे सरस्वती वीणा वादन, मास्टर व्यंकटेश कुमार जाधव व कलाश्री जाधव यांचे सुंदरी वादन तसेच डॉ. संध्या जोशी यांचे शास्त्रीय व उपशास्त्रीय गायन सादर होणार आहे. कार्यक्रमाचा लाभ रसिक श्रोत्यांनी घ्यावा, असे आवाहन नितीन दिवाकर, नम्रता दिवाकर, लक्ष्मीकांत गड्डम, अरविंद लोणी, नंदकुमार स्वामी यांनी केले आहे.

## 'विठ्ठलराव'तर्फे ऊसतोड मजुरांना दिवाळी फराळाचे वाटप

**सुराज्य/श्रीपूर**



**माळखांबी (ता. माळशिरस) येथील विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याच्यावतीने सालाबादप्रमाणे यावर्षीही कारखान्याकडे ऊसतोडणीसाठी आलेल्या ऊसतोडणी मजुरांना दिपावली सणानिमित्त माळशिरस गटातील माळखांबी येथे लाडू व चिवडा फराळाचे वाटप राष्ट्रवादी काँग्रेस माढा विधानसभा मतदारसंघाचे उपाध्यक्ष भाऊसाहेब भांगे व माळखांबी विविध कार्यकारी विकास सोसायटीचे चेअरमन मनोज शेळके यांच्या हस्ते करण्यात आले.**


बीड, नांदेड, जालना, जळगाव, नंदुरबार, लातूर, हिंगोली व इतर भागातून ऊसतोडणी मजूर ऊसतोडणीच्या कामासाठी विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्यावर येत आसतात. त्या ऊसतोडणी मजूर यांना प्रतिवर्षी कारखान्यामार्फत लाडू व चिवडा फराळाचे वाटप करण्यात येत आहे.

ऊसतोडणी मजुरांना ऐन दिवाळी सणाच्या काही दिवस आधी घर सोडावे लागते. सकाळपासून संध्याकाळपर्यंत ते ऊस तोडण्याचे काम करतात. त्यामुळे त्यांची दिवाळी ही ऊसाच्या फडावरच असते. त्यांची दिवाळी गोड व्हावी म्हणून विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक चेअरमन आ. बबनराव शिंदे यांच्या संकल्पनेतून कारखाना व्यवस्थापनाने आपल्या कारखान्याकडे आलेल्या ट्रक, ट्रॅक्टर, बैलगाडी, ट्रॅक्टर बजाट वरील ऊसतोडणी मजुरांना फराळाचे वाटप करण्यात येत आहे.

यावेळी माळशिरस गाटाचे ग्रीओव्हरसिअर प्रदीप राजमाने, चंद्रकांत सावंत, निशांत शेळके, बबन नवगिरे, अतुल कचरे, विकास खटके, चैतन्य चव्हाण, वैभव शेळके, नितीन शेळके, हर्षवर्धन शेळके, अमर भाग्यवंत, तानाजी कचरे, महादेव माने उपस्थित होते.

## हनुमानवाडीतील पालखी मार्गाचे काम निकृष्ट दर्जाचे

**सुराज्य/अरण**



हनुमानवाडी तुळशी येथील पालखी मार्गाचे काम निकृष्ट दर्जाचे सुरू असून, पुल बनवून रस्ता निट झाल्याशिवाय पालखी मार्गाचे काम करु देणार नाही आणि तसेच काम सुरू केल्यास आमरण उपोषण करण्याचा इशारा हनुमानवाडी नागरिकांनी एका लेखी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी, प्रांत, सोलापूर, सार्वजनिक बांधकाम अभियंता, तहसीलदार तसेच मुख्यमंत्री व बांधकाममंत्री यांना दिला आहे.

या निवेदनावर संदीप कुलकर्णी, निवृत्ती सुरवसे, ग्रामपंचायत सदस्य प्रभाकर मोरे, रवी आपटे, राजाभाऊ दगडे, सुरवसे, गेंड, कुलकर्णी, मोरे, ढेरे वस्ती, माळी वस्ती येथील नागरिकांच्या सह्या आहेत. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून तुळशी ते हनुमान वाडी (संताच्या पायी वारी परतीचा पालखी मार्ग आहे) व पंतप्रधान ग्राम सडक योजनेतून हनुमान वाडी ते वरवडे रस्ता क्रमांक २५४ या रस्त्याचे काम हे सध्या अत्यंत निकृष्ट दर्जाने करण्याचे चालू आहे. याच रस्त्याने निवृत्ती महाराज, एकनाथ महाराज, श्रीपाद माऊली व इतर पालख्या याच मार्गाने जात असतात. ग्रामस्थांनी ठेकेदारांना वारंवार सांगूनही तो ठेकेदार या ग्रामस्थांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करत आहे. तरी आपण या या ठेकेदाराची चौकशी करून त्यावर ती कारवाई करावी,

## मळेगाव स्पर्धेत महालक्ष्मी आट्यापाट्या संघ विजेता

**सुराज्य/पिलीव**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील महालक्ष्मी आट्यापाट्या संघ मळेगाव (ता. बार्शी) याठिकाणी शिवाजी कला क्रीडा व बहुउद्देशीय मंडळाने आयोजित केलेल्या स्पर्धेत दुसरा क्रमांक पटकाविला. याबद्दल संघाला रोख १५ हजार रुपये बक्षीस तसेच चषक देऊन गौरविण्यात आले. यामध्ये वसंत लेंगरे, संजय मदने, संदीप काळे, अक्षय लेंगरे, धनाजी लेंगरे, सुरज मदने हे सर्व खेळाडू सहभागी झाले होते.

यावेळी पिलीवचे माजी सरपंच अमोल मदने, झिंजेवस्तीचे माजी उपसरपंच सर्जेराव मदने, कुसमोडचे माजी उपसरपंच संजय पाटील, महावीर धायगुडे, मनोहर लवटे, धनाजी वाघ, शहाजी लेंगरे, लक्ष्मण पवार, गोपाळ माळी, उत्तम करांडे, अंकुश लेंगरे, विजय मदने, रणजित मदने यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रविवारी राज्यस्तरीय काव्य महोत्सवाचे आयोजन

**सुराज्य/सोलापूर**

काव्यप्रेमी शिक्षक मंच साहित्य संस्थेच्यावतीने राज्यस्तरीय काव्यमहोत्सवाचे आयोजित करण्यात आले आहे. काव्यप्रेमी शिक्षक मंचचे मार्गदर्शक तथा इंडियन मॉडेल स्कूलचे संस्थापक अध्यक्ष प्रा. ए. डी. जोशी यांच्या अमृतमहोत्सवाचे औचित्य साधून रविवार, ३० रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत प्रा. ए. डी. जोशी सभागृह, इंडियन मॉडेल स्कूल, येथे सदर काव्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

उद्घाटन सोहळा पुण्याचे कवी, गझलकार बबन धुमाळ यांच्या अध्यक्षतेखाली मसाप जुळे सोलापूरच्या कार्याध्यक्षा सायली जोशी यांच्या हस्ते पुण्याचे प्रख्यात गझलकार मसूद पटेल, अमरावतीच्या साहित्यिका सीमा भांदर्गे, मुंबईचे साहित्यिक बाळासाहेब तोरस्कर यांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. त्यानंतर सकाळच्या सत्रात काव्य प्रभात, गझल बहार, काव्यगंध सहभागी आदी वविध सत्र होणार आहेत.

दुपारी १२ ते १ या वेळेत आकाशवाणी सोलापूरचे केंद्र निदेशक राजेंद्र दासरी यांच्या हस्ते, काव्यप्रेमी शिक्षक मंचचे संस्थापक अध्यक्ष आनंद घोडके यांच्या अध्यक्षतेखाली सोलापूर आकाशवाणीचे प्रसारण अधिकारी सुजितकुमार बनसोडे, काव्यप्रेमी शिक्षक मंचचे राज्यसचिव कालिदास चवडेकर, राज्य कोषाध्यक्ष कृष्णा शिंदे यांच्या उपस्थितीत जोशी यांचा सत्कार, पुरस्कार वितरण व पुस्तक प्रकाशन सोहळा होणार आहे. सायं ६:३० वाजता मसाप जुळे सोलापूरचे अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली प्रशांत जोशी, भरतकुमार मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत सहभागी कवींचा सन्मान सोहळा व समारोप होणार आहे, असे १२व्या राज्यस्तरीय काव्य महोत्सवाचे संयोजक युवराज जगताप (बार्शी), महेश रायखेलकर (सोलापूर), लक्ष्मण काटेकर (करमाळा) व काव्यप्रेमींचे पुणे विभागीय अध्यक्ष नवनाथ खरात यांनी सांगितले.

## वांगी, काकडीचे दर कडाडले



कृषी उत्पन्न बाजार समितीकडून शुक्रवार, २८ ऑक्टोबर रोजी मिळालेल्या माहितीनुसार भाजीपाल्यांच्या दरात वाढ झाली. यामध्ये कारली, वांगी, कोबी, ढोवळी मिरची, काकडी, गवार, कोथिंबीर, फ्लॉवर, लसूण, हिरवी मिरची, लिंबू आदींच्या दरात प्रतिक्विंटल हजार ते अडीच हजार रूपयेने वाढ झाली आहे.

### सोलापूर बाजारभाव

| शेतमाल | कमीत कमी दर (क्विं.) | जास्तीत जास्त दर (क्विं.) | सर्वसाधारण दर |
|---|---|---|---|
| सफरचंद | ३,५०० | ६,००० | ५,००० |
| कारली | २,५०० | ४,००० | ३,००० |
| वांगी | २,५०० | ७,५०० | ५,००० |
| कोबी | १,००० | २,१०० | १,५०० |
| ढोवळी मिरची | १,५०० | ४,००० | २,५०० |
| गाजर | १,५०० | ३,२०० | २,००० |
| गवार | ३,००० | ६,००० | ५,००० |
| कोथिंबीर | ९०० | २,००० | १,८०० |
| काकडी | २,००० | ४,००० | ३,००० |
| फ्लॉवर | १,००० | १,५०० | १,३०० |
| लसूण | १,००० | ४,००० | १,९०० |
| घेवडा | ५,००० | ५,००० | ५,००० |
| हिरवी मिरची | १,८०० | २,५०० | २,००० |
| अंबाडी भाजी | ५०० | ७०० | ६०० |
| कांदा पात | ८०० | १,००० | ९०० |
| बटाटा | ८५० | २,८५० | २,००० |
| राजगिरा | ५०० | ८०० | ६०० |
| लिंबू | १,५०० | ४,५०० | ३,००० |
| तांदूळ | ३,०१० | ६,३८५ | ३,७२५ |
| दोडका | १,८०० | २,५०० | २,००० |
| शेपू | ७०० | १,००० | ८०० |
| पालक | ८०० | १,२०० | १,००० |
| टोमॅटो | १,००० | २,५०० | १,७०० |
| गहू | २,२९५ | ३,२३० | २,७३५ |

## ललितच्या शिष्यवृत्तीने दिले बहिणींना पंखाचे बळ

### इंदापुरे कुटुंबियांचा दानशूरपणा; भाऊबिजेनिमित्त दिली अकरा सायकलींची ओवाळणी

**सुराज्य/सोलापूर**

**वास्तुकला पदवीचे शिक्षण घेत असलेल्या ललित इंदापुरे या विद्यार्थ्याने त्याला मिळालेल्या शिष्यवृत्तीचा सदुपयोग करीत येथील भू. म. पुल्ली कन्या प्रशालेच्या विद्यार्थीनींना भाऊबीजेला ओवाळणी च्या रुपात अकरा सायकली भेट दिल्या.**



गरीब होतकरू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी प्रोत्साहन देणाऱ्या नवनाथ इंदापुरे कुटुंबातील ललित हे मुंबई येथे वास्तुकला पदवीचे शिक्षण घेत आहेत. त्यांना शिष्यवृत्ती मिळत आहे. दीपावलीच्या सुट्टीनिमित्त सोलापुरात आलेल्या ललितला पूर्व भागातील अनेक मुली लांब अंतरावरून चालत शाळेला जाण्यासाठी धडपडत असल्याचे चित्र दिसून आले. आपल्या शिष्यवृत्तीची रक्कम गरीब विद्यार्थ्यांसाठी खर्च करण्याचा मनोदय पालकांकडे व्यक्त करीत त्याने येथील भू.म.पुल्ली कन्या प्रशालेच्या प्रशासनाशी संपर्क साधला. मुलींसाठी आर्थिक मदत करण्याचा मनोदय व्यक्त केला.

प्रशासनाने शाळेच्या सायकल बँकेसाठी मदत करण्याचे सुचविले. त्यास प्रतिसाद देत तब्बल अकरा सायकली दिल्या. विद्यार्थीनी, पालक आणि शिक्षक यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या कार्यक्रमात पद्मशाली ज्ञाती संस्थेचे अध्यक्ष सुरेश फलमारी आणि उपाध्यक्ष अशोक इंदापुरे यांच्या हस्ते मुलींना सायकल प्रदान करण्यात आले. यावेळी भारती इंदापुरे, पद्मशाली शिक्षण संस्थेचे संचालक विजयकुमार गुल्लापल्ली, अशोक बल्ला आणि ललित, नवनाथ, राजीव, संजीव, नागनाथ, आनंद या इंदापुरे कुटुंबातील सदस्यांसह मुख्याध्यापिका गीता सादूल, उपमुख्याध्यापक मधुकर धर्मसाले, उमा कोटा, प्रणिता सामल, हरिप्रसाद बंडी, आदी उपस्थित होते.

दिपावलीच्या सुट्ट्या असल्या तरी शाळेत आलेल्या मुलींच्या चेहऱ्यावर नवीन सायकल मिळणार याचा अत्यानंद ओसंडून वाहत होता. बहिणींकडून दानशूर भावाचे भाऊबीज करून औक्षण करण्यात आले. शाळेत चालत आलेल्या या विद्यार्थिनी ललीतने ओवाळणी स्वरूपात दिलेल्या सायकलवर स्वार होत हर्षोउल्हासात घराकडे धूम ठोकली.



## हनुमान मंदिरात दीपोत्सव उत्साहात

**सुराज्य/सोलापूर** : निलमनगर येथील हनुमान मंदिरात नेताजी संस्थेच्यावतीने दिपोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. संस्था अध्यक्ष अण्णाराव कुंभार व ललिता कुंभार यांच्या हस्ते हनुमान मंदिरातील मूर्तीची विधीवत पूजन व दिपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी सेवानिवृत्त मुख्याध्यापक सुभाष धुमशेट्टी, प्राचार्य विजयकुमार हुल्ले, मुख्याध्यापक रविशंकर कुंभार, मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी कुंभार, मुख्याध्यापिका वैशाली कुंभार, पर्यवेक्षक गौरीशंकर आंळगे उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विठ्ठल कुंभार, लक्ष्मीकांत त्रिशुले, धर्मराज बळळारी,विश्वाराध्य मठपती, शैलेश स्वामी, अशोक पाटील, सिध्दाराम कुंभार, विनायक कोरे, म्हेत्रे, राजेंद्र मुलगे, शितल पाटील, प्रा. करजगी, प्रशांत पटणे यांनी परिश्रम घेतले. शाळेतील कला, क्रीडा, स्काऊट गाईड विभागातील विद्यार्थ्यांनी शिस्तबध्द पद्धतीने नियोजन केले होते.



## विरवडे बु. येथे अखंड हरिनाम सप्ताहास सुरुवात

**सुराज्य/विरवडे बु.** : सीना नदीकाठी वसलेल्या मोहोळ तालुक्यातील विरवडे बु. येथील जागृत ग्रामदैवत हनुमान अखंड हरिनाम सप्ताहास सुरुवात झाली आहे. १०० वर्षांपासून परंपरेपासून चालत आलेल्या तात्यासाहेब वासकर महाराज यांच्या आशीर्वादाने व श्री गुरुवर्य हभप विठ्ठल वासकर महाराज यांच्या प्रेरणेने अखंड हरिनाम सप्ताहाची सुरुवात करण्यात आली आहे.

सप्ताहाची सुरुवात २६ पासून सकाळी वीणा पूजन करून श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायणाने झाली. रोज प्रवचन, अभंग, काकड आरती आदी कार्यक्रम होत आहे. शेवटच्या दिवशी संध्याकाळी भारुडाचा कार्यक्रम तर पहाटे ५ वाजता हनुमान पालखी व दिंडी प्रदक्षिणा काढण्यात येणार आहे.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM DUE DATE EXTENSION NOTICE**

| Sr. No | Tender No. | Tender Details | Tender / Enquiry RFx Number | Amount | EMD | Tender Fee | Tender Publication Date |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | EE/EHV/ O&M/ SUR/SRM/ T-19/2022-23 | SRM due date extension notice of Tender for the Work of annual maintenance contract for periodic maintenance of yard lighting system at various EHV Substations as and when required under jurisdiction of EHV O & M Division, Solapur. | RFx No: 7000024951 | Rs. 25,00,000/- Including Taxes | Rs. 25,000/- | Rs. 525/- Including GST | From Dt. 22.10.2022 @ 09:00 Hrs To Dt.28.10.2022 up to 23:00 Hrs |

For more details, please visit SRM website: **www.mahatransco.in** or **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Details :** Dy. Executive Engineer - 7447441043

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV O & M Division, Solapur**

## दोन भावांच्या भांडणात परस्पर विरोधी फिर्यादी

# जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी सहा जणांवर तर जातिवाचक शिवीगाळ केल्याप्रकरणी दोघांवर गुन्हा

सुराज्य/मोहोळ

**पेनूर येथे दोन भावांच्या भांडणात दोन परस्पर विरोधी फिर्यादी दाखल झाल्या असून मारुती गवळी यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार विनयभंग व जिवे मारण्याचा प्रयत्न केल्या प्रकरणी सहा जणांवर तर राजेंद्र आवारे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार जातिवाचक शिवीगाळ, दमदाटी व मारहाण केल्या प्रकरणी दोन जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

याबाबत मोहोळ पोलिसांनी दिलेल्या अधिक माहितीनुसार, पेनूर येथील मारुती विश्वंभर गवळी व त्यांचे भाऊ यशवंत विश्वंभर गवळी यांचा रस्त्यामध्ये गेलेल्या शेत जमिनीच्या पैशावरून न्यायालयात वाद सुरू आहे. दरम्यान दि.२४ ऑक्टोबर रोजी दुपारी तीन वाजताच्या दरम्यान मारुती गवळी यांच्या घरी गावातील राजू आवारे हा टेम्पोमध्ये दिवाळी सणासाठी वाटप करणारे फराळाचे साहित्य घराचे गेट उघडून टेम्पो आत मध्ये घेऊन आला. त्यावेळी सदर गाडीच्या चालकास गाडी येथे कशाला आणलात, साहित्य घेऊन जावा असे म्हणाल्याने त्यांनी यशवंत गवळी यांना फोन करून बोलावून घेतले. त्यावेळी यशवंत गवळी, गौरव यशवंत गवळी, गिरीश यशवंत गवळी, तुकाराम ऊर्फ आबा अंकुश गवळी, गणेश धर्मा चवरे हे घरासमोर आले. त्यावेळी यशवंत गवळी यांनी फिर्यादी मारुती गवळी यांना तू घराबाहेर हो, आणलेले साहित्य घरामध्ये उतरावयाचे आहे असे सांगितले. त्यावेळी मारुती गवळी यांनी येथे साहित्य उतरवू नका असे म्हणत असताना वरील आलेल्या पाच जणांनी मारुती गवळी यांना शिवीगाळ दमदाटी करत लाथा बुक्क्याने मारहाण केली व गौरव गवळी यांनी काठीने मारहाण केली तर यावेळी त्यांच्या पत्नी सोडावयास आले असता यशवंत गवळी यांनी त्यांना मनाला लज्जा वाटेल अशी वर्तणूक केली.



तसेच मारुती गवळी यांची मुलगी सदर घटनेचे मोबाईल मध्ये चित्रीकरण करत असताना राजू आवारे याने तिचा हात धरून ओढा ओढी करत ढकलून दिले. तसेच राजू आवारे व गणेश चवरे यांनी गवळी यांच्या गळ्यातील पाच तोळे सोन्याची चैन काढून घेऊन यशवंत गवळी यांनी गळा दाबून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्या बाबतची फिर्याद मारुती गवळी यांनी मोहोळ पोलिसात दिली असून यानुसार मोहोळ पोलिसांनी यशवंत विश्वंभर गवळी, गौरव यशवंत गवळी, गिरीश यशवंत गवळी, तुकाराम ऊर्फ आबा अंकुश गवळी, गणेश धर्मा चवरे व राजेंद्र आवारे अशा सहा जणांवर ३०७, ३२७, ३५४, ३२४ आदी कलमांसह आर्म ॲक्ट नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे तर राजेंद्र सदाशिव आवारे यांनी परस्परविरोधी दिलेल्या तक्रारीनुसार दि. २४ ऑक्टोबर रोजी दु. ३ वाजताच्या दरम्यान यशवंत गवळी यांचे घरासमोर असलेल्या कंपाऊंडमधील गेट उघडून दिवाळी सणासाठी वाटप करण्यासाठी आणलेल्या फराळाचा टेम्पो उभा केला असता मारुती विश्वंभर गवळी व विकास तानाजी डोके यांनी तू इथे गेट उघडून आत कशाला आलास, असे म्हणत गच्ची धरून शिवीगाळ व दमदाटी करून लाथाबुक्क्याने मारहाण करून मारुती गवळी यांनी खिशात ठेवलेले पाच हजार रुपये काढून घेतले तर जातिवाचक शिवीगाळ करीत तोंडात शेण घालण्याचा प्रयत्न केल्या प्रकरणी राजेंद्र आवारे यांनी मोहोळ पोलिसात दिलेल्या तक्रारींनुसार मारुती विश्वंभर गवळी व विकास तानाजी डोके यांच्यावर मोहोळ पोलीस ठाण्यात अनुसूचित जाती जमाती प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अधिक तपास पोलीस निरीक्षक अशोक सायकर करीत आहेत.

## ‘भीमा’ च्या सभासदांच्या खात्यावर दिवाळी बोनस वर्ग

सुराज्य/मोहोळ : टाकळी सिकंदर, ता. मोहोळ येथील भीमा सहकारी साखर कारखान्याने सन २०२१/२२ या गाळप हंगामात गाळपास आलेल्या उसाची पूर्ण एफआरपीची रक्कम शेतकऱ्याच्या खात्यावर वर्ग केली असून, दिवाळीच्या सणासाठी म्हणून ५० रुपये प्रति टनाप्रमाणे हप्ता व एकूण एफआरपी मिळून १०४ कोटी रुपयांचे वाटप केले आहे. ऊस उत्पादक सभासदांची दिवाळी गोड व्हावी यासाठी प्रति सभासद २५ किलो साखर व दहा हजार फराळांच्या बॉक्सचे वाटप तसेच कामगारांची दिवाळी गोड व्हावी म्हणून ८.३३ टक्के बोनस वाटप करण्यात आल्याची माहिती कारखान्याचे अध्यक्ष खा. धनंजय महाडिक यांनी दिली. उपाध्यक्ष सतीश जगताप म्हणाले, ‘कारखाना प्रशासनाने चालू गळीत हंगाम यशस्वी करण्यासाठी जय्यत तयारी केली असून, ऊस तोडणी टोळ्या कारखाना कार्यस्थळावर दाखल होत आहेत. खासदार महाडिक हे दिलेला शब्द पाळणारे आहेत. त्यांनी यापूर्वी दिलेली सर्व आश्वासने पाळली आहेत. चालू गळीत हंगामात गाळपासाठी येणाऱ्या उसाला पहिली उचल प्रति टन २ हजार १०० रुपयाप्रमाणे जाहीर केली आहे. त्यामुळे सभासदात आनंदाचे वातावरण आहे. शनिवार दि. २२ ऑक्टोबरपासून सभासदांना साखर वाटपास कारखाना कार्यस्थळावर सुरुवात करण्यात आली आहे.

## आनंदाचा शिधा कीट पूर्ण नाही दिल्यास आंदोलन करणार : पाटील

सुराज्य/सोलापूर : दुकानदारांना अर्धवट धान्य आणि आनंदाची शिधा किट पूर्ण मिळाले नाही तर नागरिकांना घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जनआंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा माजी सभागृह नेता सुरेश पाटील यांनी दिला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी महाराष्ट्रातील शिधाधारकांना १ महिनापूर्वी दिवाळी गिफ्ट म्हणून १०० रुपयात साखर, रवा, तेल व तूरदाळ असे इतर प्रत्येकी एक किलो देण्याची घोषणा केली आहे. परंतु काही दुकानात अर्धवट किट वितरित झाल्याने नागरिक अद्याप किट व धान्यापासून वंचित आहे.

दिवाळी किट वाटप करताना कुठे गैरकृत्य झाल्यास किंवा नागरिकांना धान्य आणि किट दिवाळीपर्यंत न दिल्यास आम्ही जनआंदोलन करू, असा पवित्रा माजी सभागृह नेता सुरेश पाटील यांनी घेतला आहे. या रेशन दुकानधारकांना पूर्ण धान्य आणि दिवाळी आनंदाची शिधा किट न दिलेल्या अधिकाऱ्याची चौकशी करून दोषींवर फौजदारी गुन्हा दाखल करावे, असेही माजी सभागृह नेता सुरेश पाटील म्हणाले.

## गुरूसेवा पॅनलमधील संचालकांचा रणजितसिंहांच्या हस्ते सत्कार

सुराज्य/अकलूज : सोलापूर जिल्हा प्राथमिक शिक्षक पतसंस्थेची निवडणूक नुकतीच पार पडली. या निवडणुकीत शिक्षक संघ शिवाजीराव पाटील व संभाजीराव थोरात गट, आदर्श शिक्षक समिती व इतर समविचारी संघटना यांचा मिळून गुरुसेवा पॅनल तर शिक्षक समिती, जुनी पेन्शन हक्क संघटना व इतर समविचारी संघटना यांचा मिळून स्वाभिमानी परिवर्तन पॅनल अशी लढत होऊन गुरुसेवा पॅनलचे पुन्हा एकदा वर्चस्व सिद्ध झाले. निवडणुकीत माळशिरसचे विठ्ठल रावसाहेब काळे हे सर्वसाधारण गटातून जिल्ह्यात सर्वाधिक ३९१२ सर्वाधिक एक नंबरची मते घेऊन तर संभाजी उत्तमराव फुले यांनी दोन नंबरची मते घेऊन विजयी झाल्याबद्दल आ. रणजितसिंह यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

## ड्रायव्हरच्या खिशातील १० हजार रुपये लुटले

पंढरपूर : ट्रॅक्टर आणि ट्रॉली चे दहा टायर बरचीने फोडून तिघा दरोडेखोरांनी ड्रायव्हरच्या खिशातील १० हजार रुपये लुटून पोबारा केला. ही घटना वाखरी (ता. पंढरपूर) येथे बुधवारी रात्रीच्या सुमारास घडली. समाधान सुरेश पाटील (वय २८ राहणार भडगाव जि. जळगाव) हे बुधवारी रात्री ८ वाजेच्या सुमारास ऊस वाहतुकीचा ट्रॅक्टर ट्रॉली सहित घेऊन निघाला होता. वाखरी येथील थोरात पेट्रोल पंपा जवळ आला असता ट्रॅक्टरचे एक चार पंक्चर झाले.तो कसाबसा ट्रॅक्टर चालवीत पेट्रोल पंपाजवळ आला. त्यावेळी दुचाकीवरून आलेल्या तिघा दरोडेखोरांनी त्याला चापटाने मारहाण केली. आणि त्याच्याजवळ असलेल्या बरचीने ट्रॅक्टर आणि ट्रालीचे असे मिळून ११ टायर फोडले. आणि ड्रायव्हरच्या खिशातील दहा हजार रुपये घेऊन पोबारा केला.

**अज्ञात वाहनाच्या धडकेत तरुणाचा मृत्यू**

वागदरी : अक्कलकोट रोडवरील मंगरूळ पेट्रोल पंपाच्या समोर कोणीतरी अज्ञात वाहनाने जोरात धक्का दिल्याने एका तरुणाचा मृत्यू झाला ही घटना दिनांक २५ रोजी सायंकाळी घडली राजकुमार कमलाकर खरात (वय २६ राहणार बादोले) बु.असे मृत तरुणाचे नाव आहे. अभिजीत पांडुरंग रुपनवरे हा कोल्हापूर वरून गावी येत होता त्याला आणण्यासाठी राजकुमार हा अक्कलकोटकडे निघाला होता. अक्कलकोट पासून हाकेच्या अंतरावरती राजकुमार खरात यास अज्ञात वाहनाने जोरात धक्का दिल्याने तो रस्त्याच्या बाजूला दुचाकीसह पडला. मयत राजकुमार यास डोक्यात जबर मार लागला होता त्यातच त्याचा मृत्यू झाला. सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश भावी कट्टी हे करीत आहेत.

## जय शिवराय प्रतिष्ठानचा शिवदीप महोत्सव उत्साहात

सुराज्य/बार्शी



येथील जय शिवराय प्रतिष्ठानच्या वतीने शिवदीप महोत्सवाच आयोजन करण्यात आलं होतं तसेच सालाबाद प्रमाणे याही वर्षी IAS अधिकारी बोलवण्याची परंपरा या माध्यमातून कायम राहिली.

या कार्यक्रमासाठी उंडेगावचे सुपुत्र ख ड अधिकारी उपमुख्यमंत्री कार्यालय महाराष्ट्राचे सहसचिव श्री संतोष पाटील साहेब हे कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून लाभले. यावेळी तालुका कृषी अधिकारी माढा भारत कदम, शिवाजी महाविद्यालयाच्या प्रा.भारती रेवडकर स्मार्ट ॲकॅडमीचे अध्यक्ष सचिन वायकुळे, ॲड. महेश जगताप, प्रशांत एडके, ॲड. राजश्री डमरे आदी या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. शेकडो दिवे आणि मशाली व फुलांच्या सजावटीमुळे मूर्ती परिसर अतिशय मनमोहक दिसत होता. याचबरोबर मान्यवरांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

संतोष पाटील म्हणाले की, समाजामध्ये कृतीतून शिव विचार रुजवणाऱ्या संघटना समाज घडवू शकतात याचे उत्तम उदाहरण जय शिवराय प्रतिष्ठान आहे. वायकुळे यांनी बार्शीतील सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या प्रत्येक संघटना या समाजासाठी आदर्शवत आहेत असं मत व्यक्त केलं. यावेळी एकविराई मर्दानी आखाडा, बार्शीतील हर हर महादेव या चित्रपटात काम करणाऱ्या ५६ कलाकारांचा मान्यवरांच्या शुभहस्ते जय शिवराय प्रतिष्ठानच्या वतीने सन्मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला. सूत्रसंचालन संकेत वाणी यांनी केले. तर आभार अविनाश वैद्य यांनी मांडले. या कार्यक्रमासाठी जय शिवराय प्रतिष्ठानच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

## ३२व्या राष्ट्रीय खो-खो स्पर्धेसाठी फलटणनगरी सज्ज

### आजपासून स्पर्धा; ३२ राज्याचे संघ भाग घेणार

सुराज्य/अकलूज

३२ वी किशोर-किशोरी राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धेचे आयोजन २९ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर २०२२ या कालावधीत आमदार श्रीमंत विजयसिंहराजे उर्फ शिवाजीराजे मालोजीराजे नाईक-निंबाळकर क्रीडा संकुल, घडसोली, फलटण, सातारा येथे होणार आहे.

सदर राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धा भारतीय खो-खो महासंघ व महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने सातारा जिल्हा ॲमॅच्युअर खो-खो असोसिएशनच्या अधिपत्याखाली संपन्न होणार आहे. या खो-खो स्पर्धेची तयारी अंतिम टप्प्यात असून सातारा जिल्ह्यातील फलटणनगरी सज्ज झाली आहे.

स्पर्धेचे उद्घाटन विरोधी पक्षनेते अजित पवार यांच्या हस्ते २९ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ४:०० वाजता होणार आहे. महाराष्ट्र खो-खो संघटनेचे अध्यक्ष व स्पर्धा अध्यक्ष संजीवराजे नाईक निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धेची तयारी पूर्ण झाली आहे. या स्पर्धेसाठी चार मैदाने तयार केली असून त्यातील एक मैदान मॅटचे तयार केले आहे. सर्व मैदानावर विद्युतझोताची तयारी करण्यात आली आहेत.

## सासवाड माळीनगर कारखाना देणार २१०० रुपयांचा पहिला हप्ता

### ९०व्या गळीत हंगामास प्रारंभ

सुराज्य/माळीनगर

**दि सासवड माळी शुगर फॅक्टरीच्या ९०व्या ऊस गाळप हंगामाचा शुभारंभ ऊस उत्पादक बागायतदार भीमराव नामदेव ढाळे, अर्जुन नामदेव ढाळे (महूद), लक्ष्मण भिकूदास सरक (तिरवंडी) यांच्या हस्ते ऊस मोळीचे पूजन करून गव्हाणीत मोळी टाकून गाळपास प्रारंभ झाला.**



यावेळी मॅनेजिंग डायरेक्टर राजेंद्र गिरमे म्हणाले, ‘यंदा कारखान्यात गाळप होणाऱ्या उसास पहिला हप्ता २१०० रुपये देण्यात येणार असून कारखान्याने सहा लाख टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट ठेवले आहे. यंदा ५५ टक्के खोडवा ऊस गाळपास येण्याचा अंदाज आहे. दररोज पाच हजार टन ऊस गाळपाचे नियोजन आहे. यंदा २०० ट्रक-ट्रॅक्टर, २०० बैलगाड्या, १५० डंपिंग अशी वाहतूक यंत्रणा सज्ज असल्याचेही सांगितले.

यावेळी कारखान्याचे व्यवस्थापकीय संचालक राजेंद्र गिरमे, पूर्णवेळ संचालक सतीश गिरमे, उपाध्यक्ष परेश राऊत, संचालक राहुल गिरमे, मोहन लांडे, विशाल जाधव, निळकंठ भोंगळे, निखिल कुदळे, सतीश साबडे, सतेज पैठणकर, एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष प्रकाश गिरमे, खजिनदार नितीन इनामके, संचालक अजय गिरमे, पृथ्वीराज भोंगळे, दिलीप इनामके, शुगरकेनचे अध्यक्ष अमोल ताम्हाणे, उपाध्यक्ष कपिल भोंगळे, संचालक सुरेश राऊत, माजी अध्यक्ष पुष्कर इनामके उपस्थित होते.

## स्वेरीच्या दहा विद्यार्थ्यांची ‘पर्सिस्टंट सिस्टिम्स’ कंपनीत निवड

सुराज्य/पंढरपूर : ‘पर्सिस्टंट सिस्टिम्स’ या बहुराष्ट्रीय दर्जाच्या कंपनीने घेतलेल्या मुलाखतीत श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या १० विद्यार्थ्यांची कॅम्पस इंटरव्यूहद्वारे निवड करण्यात आली आहे’, अशी माहिती संस्थेचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांनी दिली.

‘पर्सिस्टंट सिस्टिम्स’ या नामांकित व बहुराष्ट्रीय दर्जाच्या कंपनीच्या निवड समितीने गोपाळपूर येथील इंजिनिअरिंग कॉलेजमधील विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या. त्यांनी या निवड प्रक्रियेच्या अंतिम फेरीतून अभिषेक श्रीमंत बनगर, स्नेहा चिंतामणी लोहोकरे, वैष्णवी ज्ञानेश्वर जगनाडे, भास्कर अनिल इताप, विश्वजित उदय राजोपाध्ये, सुरज बाळकृष्ण गुंड, प्रशांत जगन्नाथ जलगिरे, स्नेहल विद्यासागर देशमाने, अजय वैजिनाथ धबडे व जयेश सतिश इंगळे या १० विद्यार्थ्यांची निवड केली. या विद्यार्थ्यांना प्रत्येकी रुपये ४.७१ लाखांचे वार्षिक पॅकेज मिळाले आहे.

सुराज्य सोलापूर
Classified

**विवाह विषयक**

● सर्व जाती धर्मातील प्रथम वधु/वर, विदुर, विधवा, घटस्फोटीत, आंतरजातीय, शासकीय/निमशासकी भरपूर स्थळे उपलब्ध. एकदाच नोंदणी करा लग्न जमेपर्यंत स्थळं उपलब्ध करुन दिले जातील.

श्री तुळजाभवानी वधु-वर सुचक केंद्र, तुळजापूर.

संपर्क : **7387906921**

(121122)

**पाहिजे**

● श्री. तुळजाभवानी वधु-वर सुचक केंद्र, तुळजापूर येथील कार्यालयात १ स्मार्ट लेडीची आवश्यकता (फोनवर माहिती सांगण्यासाठी) आहे. शिक्षण किमान १२ वी आवश्यक, अपेक्षित पगार दिला जाईल. गरजूंनी संपर्क साधावा.

श्री तुळजाभवानी वधु-वर सुचक केंद्र, तुळजापूर.

संपर्क : **8378851719**

(261022)

## एक तास शर्थीच्या प्रयत्नानंतर घुबडाची अखेर सुटका!

नॅचरल ब्ल्यू कोब्रा संघटना, पिंटू ढावरे व अग्निशामक दलामुळे मिळाले जीवदान!

सुराज्य/सोलापूर

**एक तास शर्थीच्या प्रयत्नानंतर मांजामुळे झाडावर अडकलेल्या घुबडाची अखेर सुटका करण्यात सामाजिक कार्यकर्ते पिंटू ढावरे , नॅचरल ब्लु कोब्रा संघटनचे पक्षीमित्र व महापालिका अग्निशामक दलाला यश आले. त्या घुबडाला जीवदान मिळाले. नॅचरल ब्लु कोब्रा संघटनच्या पक्षीमित्रांच्या सहाय्याने शेवटी या घुबडाला निसर्गाच्या सानिध्यात मुक्त सोडण्यात आले. बुधवार पेठेतील मिलिंद नगरात सोमवारी सकाळी ही घटना घडली.**




बुधवार पेठ येथील मिलिंद नगराच्या मुख्य प्रवेशद्वारा जवळच आत मध्ये असलेल्या बदामाच्या झाडावर सोमवारी सकाळी एक घुबड पक्षी अडकलेला दिसून आला. पायाला मांजा गुंडाळल्यामुळे तो झाडाच्या फांदीवर अडकलेला होता. त्याची धडपड पाहून मिलिंद नगरातील महिलांसह आबालवृद्ध नागरिकांनी एकच गर्दी केली. सुटका करण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू केले. दरम्यान, येथील सामाजिक कार्यकर्ते चन्ना चंदनशिवे यांनी नॅचरल ब्लू कोब्रा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधला. महापालिकेच्या अग्निशामक दलाची गाडी बोलावून घेतली. नॅचरल ब्लू कोब्रा संघटनेचे अनिल अलदर, दीपक इंगळे व येथील सामाजिक कार्यकर्ते पिंटू डावरे यांनी अग्निशामक दलाच्या गाडीवर चढून या घुबडाची सुटका करण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. अखेर सामाजिक कार्यकर्ते पिंटू डावरे यांच्यासह पक्षीमित्रांनी सुखरूपपणे त्या घुबडाची सुटका केली. यामध्ये त्या घुबडाला कोणतीही इजा होणार नाही याची काळजी घेतली.

त्या घुबडाची सुखरूपपणे सुटका झाल्याने या परिसरातील महिला व आबालवृद्धांनी सुटकेचा नि:श्वास सोडला. सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून येत होता. शेवटी नॅचरल ब्ल्यू कोब्रा संघटनेचे दीपक इंगळे व अनिल अलदर यांच्याकडे ते घुबड सोपविण्यात आले. निसर्गाच्या सानिध्यात ते घुबड सोडण्यात आले. पक्षी मित्र व सामाजिक कार्यकर्त्यांच्या प्रयत्नामुळे त्या घुबडास जीवदान मिळाले.

दरम्यान, पक्षी व प्राण्यांवर प्रेम व दया करा. अशा घटना आढळून आल्यास नॅचरल ब्ल्यू कोब्रा संघटनेशी संपर्क साधा असे आवाहन करत सर्प व पक्षी मित्र दीपक इंगळे आणि अनिल अलदर यांनी सर्वांचे आभार मानले.

## रोजंदारी कामगारांच्या नियमितीकरणाचा प्रस्ताव लवकरच शासनाकडे पाठवावा

### डॉ.आंबेडकर ट्रेड युनियनच्यावतीने मागणी

सुराज्य/सोलापूर

महापालिकेतील सन १९९५ नंतरचे ३६ रोजंदारी, बदली कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून त्यासह २५७ कर्मचाऱ्यांच्या नियमितीकरणाचा प्रस्ताव नगरविकास विभागाकडे पाठवावा तसेच महापालिकेतील १९९५ पूर्वीच्या १३१ रोजंदारी कर्मचाऱ्यांना कायम करण्याचे नियुक्ती पत्र लवकर द्यावे, अशी मागणी महामानव डॉ. आंबेडकर ट्रेड युनियनच्यावतीने महापालिका आयुक्त शिवशंकर यांच्याकडे केली आहे.

सोलापूर महापालिकेच्या आस्थापनेवर सन १९९५ नंतर रोजंदारी म्हणून कार्यरत असलेल्या २२१ सेवकांना विशेष बाब म्हणून सेवेत कायम करण्यासाठी शासनाच्या नगर विकास विभागाकडून हालचाली सुरू झाल्या आहेत. दरम्यान, सन १९९५ नंतरच्या नियुक्त्यांबाबत जे अधिकारी जबाबदार आहेत, त्यांची जबाबदारी निश्चित करुन त्यांच्या नियमितीकरणाचा प्रस्ताव मान्यतेने शासनास पाठवावा. शासन त्यावर निर्णय घेईल, असे नगर विकास विभागाने पत्राद्वारे पालिका आयुक्तांना कळविले आहे.

१९९५ नंतर असलेल्या एकूण २५७ कर्मचाऱ्यांपैकी २२१ कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित केली आहे केवळ ३६ लोकांची जबाबदारी निश्चित करावयाची असल्या संबंधीचे अहवाल महापालिकेकडून पाठविण्यात येणार आहे. महापालिकेच्या महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर ट्रेड युनियनच्यावतीने अध्यक्ष बापू सदाफुले यांनी आमदार प्रणिती शिंदे यांच्या समवेत महापालिका प्रशासनाकडे प्रस्ताव व इतर बाबींसाठी प्रयत्न केले. दि. २५ जानेवारी रोजी आमदार प्रणिती शिंदे आणि मुख्यमंत्री तथा तत्कालीन नगर विकासमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबरोबर या विषयावर बैठक झाली होती. त्यावेळी विशेष बाब म्हणून या कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याचे आश्वासन दिले होते. वास्तविक पाहता रोजंदारी सेवकांची अंतिम स्वरूपाची प्रतीक्षा यादी तयार करत असताना नियुक्ती मंजूर अधिकाऱ्यांचीही माहिती त्यात समाविष्ट करण्यात आली होती. यामुळे या सर्व रोजंदारी सेवकांची जबाबदारी निश्चिती यापूर्वी झाले ते स्पष्ट होते. तत्कालीन आयुक्त तावरे आणि विजयकुमार काळम पाटील यांच्या काळात ही सर्व प्रक्रिया पार पाडली आहे. तेंव्हा पुन्हा ३६ कामगारांची जबाबदारी निश्चित करण्याची आवश्यकता नाही. तरीही ही जबाबदारी निश्चित करून तातडीने महापालिका प्रशासनाने शासनाच्या निर्णयानुसार आवश्यक अहवाल नगर विकास विभागाकडे पाठवावे आणि या कर्मचाऱ्यांच्या कायमसेवेचा मार्ग सुकर करावा, अशी मागणी महामानव अध्यक्ष बापूसाहेब सदाफुले यांनी केली आहे. यावेळी काँग्रेस कमिटी कामगार सेल अध्यक्ष सायमन गट्टू, कार्याध्यक्ष योहान कानेपागुलु, खजिनदार अरुण म्हेत्रे, गौतम नागटिळक, राजेंद्र कोरे, श्रीनिवास रामगल, सायबण्णा हादीमनी, रामचंद्र चंदनशिवे, पिंटू जेटीथोर आदीसह पदाधिकारी उपस्थित होते.



## वडिलांचा कानमंत्र ठरला टर्निंग पॉइंट

सुराज्य/नवी दिल्ली : भारतीय वंशाचे ऋषी सुनक यांची सोमवारी (२४ ऑक्टोंबर) ब्रिटनच्या पंतप्रधानपदी निवड झाली. सुनक हे चार वर्षांतले पाचवे पंतप्रधान आणि माजी अर्थमंत्री आहेत. पंतप्रधानपदासाठी सत्ताधारी हुजूर पक्षात पेनी मॉरडाँट आणि ऋषी सुनक यांच्यात शर्यत होती. मात्र, १०० खासदारांनी सुनक यांना पाठिंबा दिल्याने त्यांची बिनविरोध निवड झाली. मात्र, पंतप्रधानपदाचे ध्येय गाठण्यासाठी सासरे इन्फोसिसचे सर्वेसर्वा नारायण मूर्ती यांनी प्रोत्साहित केल्याचं ऋषी सुनक यांनी म्हटले आहे.

नारायण मूर्ती हे यशस्वी उद्योजक आहेत. त्यांनी हजारो लोकांना रोजगार दिला आहे. त्यामुळे संपूर्ण देशाची कल्पना बदलली आहे. याद्वारे आपण प्रभाव पाडू शकतो, असे मला वाटले होते. पण, नारायण मूर्ती यांनी सांगितले, तुम्हांला प्रभाव पाडायचा असेल, व्यवसायाऐवजी राजकारण केले पाहिजे. ते नेहमीच माझ्या मागे उभे राहून प्रोत्साहन देत होते. त्यामुळेच आज पंतप्रधानपदापर्यंत मी पोहचू शकलो, असे सुनक म्हणाले.

## ट्विटरची मालकी एलॉन मस्ककडे



सुराज्य/नवी दिल्ली : एलॉन मस्क जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती आहे. फोर्ब्सच्या लिस्टमध्ये सर्वात श्रीमंत व्यक्तींच्या यादीत एलॉन मस्क पहिल्या क्रमांकावर आहेत. एलॉन मस्क यांनी सोशल मीडिया कंपनी ट्विटर ४४ बिलियन डॉलरमध्ये विकत घेतली आहे. हा उद्योग जगाच्या इतिहासातील सर्वात मोठा करार आहे, जो पूर्णपणे ४४ बिलियन डॉलर कॅशमध्ये खरेदी करण्यात आला आहे. जर आपण भारतीय रुपयांमध्ये ४४ बिलियन डॉलर मोजले, तर ते आकड्यामध्ये लिहिणे कठीण होईल. एक बिलियन अर्थात एक अब्ज म्हणजे १०० कोटी रुपये होतात आणि एक कोटी यूएस डॉलरमध्ये जवळपास ७६ कोटी रुपये होतात. त्यानुसार एलॉन मस्क यांनी एकूण ३३६८ अब्ज रुपयांत विकत घेतले आहे. एलॉन मस्क यांनी १३ एप्रिल रोजी ट्विटर खरेदी करण्याची घोषणा केली होती. आता ट्विटरचा मालकी हक्क यांच्याकडे आला आहे.

## वुहानमध्ये स्थिती गंभीर

सुराज्य/बीजिंग : चीनमध्ये कोरोनाने पुन्हा एकदा हात-पाय पसरायला सुरुवात केली आहे. जिथे कोरोनाचा उगम झाला, त्या वुहान शहरापासून उत्तर पश्चिमेकडील अनेक शहरात कोरोनाच्या रुग्णांमध्ये वाढ झाल्याने पुन्हा एकदा लॉकडाऊनची घोषणा करण्यात आली आहे. संपूर्ण जगाला विळखा घालणाऱ्या कोरोनाचा उगम हा चीनमधील वुहानमध्ये झाला होता. वुहानमध्ये पहिला रुग्ण सापडला होता. २०१९मध्ये तिथे सगळ्यात पहिले लॉकडाऊन लावण्यात आले होते. दोन वर्षांनंतर पुन्हा एकदा वुहानमध्ये लॉकडाऊन घोषित करण्यात आले आह. स्थानिक प्रशासनाने एका जिल्ह्यात आठ लाखांहून अधिक लोकांना ३० ऑक्टोबरपर्यंत घरातच थांबण्याचे आदेश दिले आहेत.

## लग्नात रसगुल्ल्यासाठी केली हत्या

सुराज्य/आग्रा : युपीच्या आग्रामध्ये लग्नादरम्यान रसगुल्ला न मिळाल्याने चाकूने वार केल्याची घटना घडली आहे. इथे विवाह सोहळ्यादरम्यान दोन्ही पक्षांमध्ये रसगुल्ल्यावरून वाद झाला. हा वाद इतका वाढला की, चाकूने जोरदार हल्ला झाला, त्यात एकाचा मृत्यू झाला तर दुसरा जखमी झाला.

## सुनक यांचा मोठा निर्णय, राजकीय परंपरा मोडीत

ब्रिटनचे नवनिर्वाचित पंतप्रधान ऋषी सुनक यांनी आपली पत्नी अक्षता मूर्ती आणि दोन मुली यांच्यासह १० डाऊनिंग स्ट्रीटमधील छोट्या घरामध्येच राहण्याचा निर्णय घेतला आहे. लवकरच ऋषी सुनक आपल्या कुटुंबासोबत या घरात राहण्यास जाणार असल्याचे त्यांच्या प्रवक्त्याने सांगितले आहे. त्या घरात जास्त आनंद मिळत असल्याने हा निर्णय घेण्यात आल्याचेही त्यांनी म्हटले आहे. टोनी ब्लेअर यांच्या काळापासून ब्रिटनचे पंतप्रधान शेजारच्या ११ डाऊनिंग स्ट्रीटमधील (अर्थमंत्र्यांचे कार्यालय) चार शयनगृहे असलेल्या घरात राहात होते. सुनक यांनी ही परंपरा मोडीत काढली आहे. सुनक स्वत: अर्थमंत्री असताना १० क्रमांकाच्या घरात राहत होते. आम्ही या घराची सजावट केली असून आमच्या कुटुंबासाठी ते पुरेसे आहे, असे सुनक यांनी जाहीर केले आहे.

# पुराव्याविना पतीवर आरोप करणे ही क्रूरताच

## मुंबई उच्च न्यायालयाने दिला महत्त्वाचा आदेश

सुराज्य/मुंबई

**विवाहित महिलेला घरातील कामे करण्यास सांगणे ही क्रूरता नाही तसेच घरातील सुनेने केलेल्या कामाची तुलना मोलकरणीच्या कामाशी होऊ शकत नाही, असे महत्त्वाचे निरीक्षण मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने नोंदवले आहे.**

महिलेने २१ ऑक्टोबर रोजी पती व सासू-सासऱ्यांविरोधात घरगुती हिंसाचाराची तक्रार दाखल केली होती. महिलेने तक्रारीत म्हटले होते की, लग्नानंतर एक महिना तिच्या पतीने आणि सासरच्या मंडळींने तिला चांगली वागणूक दिली. मात्र, त्यानंतर तिच्यासोबत मोलकरणीसारखा व्यवहार करु लागले. दरम्यान महिलेचा हा अर्ज न्यायालयाने फेटाळून लावला आहे.

महिलेने असाही दावा केला आहे की, पती आणि सासू-सासऱ्यांनी लग्नानंतर चार कार घेण्यासाठी चार लाख रुपये माहेरुन घेऊन यावे यासाठी मागणी केली होती. तसेच त्यासाठी माझा शारिरीक आणि मानसिक छळ करण्यात आला, अशी तक्रारही तिने केली होती.

**न्यायालयाने काय म्हटले?**

न्यायालयाने या महिलेचा अर्ज फेटाळताना म्हटले आहे की, जर एखाद्या महिलेला घरातील किंवा कुटुंबातील घरकाम करायला सांगितले जात असेल तर तिच्याकडून मोलकरणीसारखे काम करुन घेतले जात आहे, असा त्याचा अर्थ होत नाहीय. तसेच त्याला क्रूरताही म्हणता येणार नाही. जर का कोणत्याही स्त्रीला घरातील काम करायचे नसेल



किंवा तशी इच्छा नसेल तर त्या महिलेने लग्नापूर्वी तसे सांगावे जेणेकरुन मुलाला लग्नापूर्वीच पुनर्विचार करणे सोपे जाईल. लग्नानंतर जर अशी समस्या निर्माण झाली तर त्यावर तोडगा काढणे आवश्यक आहे, असे महत्त्वाचे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले आहे.

न्यायमूर्ती विभा कंकणवाडी आणि न्यायमूर्ती राजेश पाटील यांच्या खंडपीठाने २१ ऑक्टोबर रोजी महिलेचा पती आणि सासू सासऱ्यांविरोधात दाखल केलेला एफआयआर रद्द करण्याचे आदेश दिले आहेत.

मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, महिलेने केवळ तिचा छळ झाल्याचे सांगितले होते. मात्र तिच्या तक्रारीत कोणत्याही कृत्याची माहिती नमूद केली नव्हती.

भारतीय दंड संहितेच्या कलम ४९८ मध्ये केवळ मानसिक आणि शारीरिक अपमानास्पद शब्दांचा वापर पुरेसा नाही, तोपर्यंत अशा कृतींचे वर्णन त्यामध्ये केले जात नाही, असे न्यायालयाने नमूद केले आहे.

# टाटा एअरबस प्रकल्प गुजरातला; राज्यात पुन्हा खळबळ

सुराज्य/अहमदनगर

**वेदांता-फॉक्सकॉनपाठोपाठ महाराष्ट्रात प्रस्तावित असलेला दुसरा मोठा प्रकल्प गुजरातला गेला आहे. टाटा समूहाचा एअरबस प्रकल्प गुजरातला गेल्यामुळे राजकीय आरोप-प्रात्यारोप सुरू झाले आहेत. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांनी खोचक टीका केली आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांच्या रुपया आणि डॉलरसंबंधीच्या एका विधानाचा आधार घेत 'हे महाराष्ट्र सरकारचे अपयश नाही तर गुजरात सरकारचे यश आहे', असे म्हणत आमदार पवार यांनी टोला लगावला आहे.**

---




ज्याप्रमाणे रुपया कमकुवत होत नसून डॉलर मजबूत होत आहे, त्याचप्रमाणे टाटा एअरबसचा २२ हजार कोटींचा प्रकल्प महाराष्ट्राबाहेर जाणं हे महाराष्ट्र सरकारचे अपयश नाही, तर गुजरात सरकारचे यश आहे. गुजरात विधानसभेची निवडणूक जिंकण्यासाठी महाराष्ट्राच्या हक्काचे प्रकल्प एकापाठोपाठ एक गुजरातला नेले जात आहेत. यामुळे ती निवडणूक भाजप कदाचित जिंकेलही परंतु या खेळात महाराष्ट्राच्या युवांचे भवितव्य चिरडले जातेय आणि सर्वच राज्यकर्ते मात्र आपल्याच धुंदीत आहेत. हे दुर्दैवं आहे, असेही पवार यांनी म्हटले आहे.

वेदांता-फॉक्सकॉनचा प्रकल्प राज्यातून गेल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या बदल्यात मोठा प्रकल्प राज्यात येईल, असा दावा केला होता. त्यामुळे टाटा-एअरबसच्या प्रकल्पाची चर्चा सुरू झाली होती. या प्रकल्पासाठी विविध राज्ये स्पर्धेत असल्याने हा प्रकल्प आधी महाराष्ट्राच्या वाट्याला यावा आणि नंतर तो नागपुरात आणला जावा, अशी फिल्डिंग लावण्यात आली होती.

भौगोलिकदृष्ट्या योग्य स्थळ, कुशल मनुष्यबळ, जमीन, पाणी व इतर सोयींसाठी नागपूर योग्य असल्याने प्रकल्प मिहानमध्ये यावा, यासाठी या भागातील उद्योजकांचे प्रयत्न सुरू होते.

## ...तर कानफाडात खेचूनही मिळवता येतो

### ओमराजे निंबाळकरांचा आक्रमक पवित्रा

सुराज्य/उस्मानाबाद

'न्याय मागून मिळत नसेल तर कानफाडात खेचून मिळवता येतो', असे ओमराजे निंबाळकर म्हणाले. आम्हांला हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरेंनी शिकवलेय असेही ओमराजे म्हणाले. गेल्या ४ दिवसांपासून आमदार कैलास पाटील हे उस्मानाबादेत शेतकऱ्यांसाठी आमरण उपोषणाला बसले आहेत. ३ लाख ५७ हजार शेतकऱ्यांच्या खात्यावर पिकविमा आणि मदतीचे १२०० कोटी रुपये तात्काळ जमा करावेत ही ओमराजेंची मागणी आहे. या मागणीसाठी उस्मानाबाद जिल्हाधिकारी कार्यालयासमोर कैलास पाटलांचे आमरण उपोषण सुरू आहे. त्यात कैलास पाटलांची तब्येत बिघडली असून प्रशासनाला जाग न आल्याने ओमराजेंनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. आता शेतकऱ्यांचा अंत पाहू नका तो आता चिडलाय, भरडलाय असे ओमराजे म्हणाले. प्रशासनाला विनंती आहे की, 'आंदोलनाला वेगळे वळण देऊ नका, असा इशाराही यानंतर ओमराजेंनी दिला आहे.'



## तुकाराम मुंडे ॲक्शन मोडवर

### बीड जिल्हा रुग्णालयाला सरप्राईज भेट

सुराज्य/बीड



**राज्याचे आरोग्य विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी शुक्रवारी बीड जिल्हा रुग्णालयात सरप्राईज भेट दिली. यावेळी रुग्णालयातील मूलभूत सुविधा आणि सेवा संदर्भात अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना चांगलेच फैलावर घेतले आहे. तर येणाऱ्या ३१ ऑक्टोबरपर्यंत अहवाल पाठवण्याचे आदेश उपसंचालक लातूर यांना दिले आहेत.**

यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुरेश साबळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ अमोल गीते, यांना सुधारणा करण्याच्या सूचना देखील केल्या आहेत. तसेच उपचारामध्ये हलगर्जीपणा आणि रुग्णांची हेळसांड सहन केली जाणार नाही, असा सज्जड दम तुकाराम मुंढे यांनी दिला आहे.

बीड जिल्हा रुग्णालयातील अति दक्षता विभाग, प्रसूती वार्ड आणि फिव्हर क्लिनिकला भेट दिली. यावेळी डॉक्टर उपलब्ध नव्हते तर खाजगी डायग्नोसिस सेंटरमधून रिपोर्ट त्यावर उपचार सुरू होते. या संदर्भात विचारणा केली तसेच नवोदित बाळाला पोलिओ डोस दिल्याचे, बेबी कार्ड तयार नव्हते यावरून कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना खडे बोल सुनावले.

# समर्थ रामदासांच्या मूर्ती चोरीचा छडा लागला

सुराज्य/जालना

अतिप्राचीन समर्थांच्या मूर्ती चोरी प्रकरणात अतिशय वेगवान घडामोडी समोर आल्या आहेत. तब्बल दोन महिन्यानंतर कर्नाटक राज्यातून दोघांना जालना स्थानिक गुन्हे शाखेने ताब्यात घेतले असून मूर्त्यादेखील हाती लागल्याची माहिती प्राप्त होत आहे. जालना LCB चे पथक सदरील प्रकरणातील आरोपींना सोबत घेऊन निघाले असून हे पथक जालना इथे आल्यावरच प्रत्यक्ष काय तो खुलासा होईल.

या मूर्ती चोरीचा अद्याप तपास लागलेला नव्हता. त्यामुळे गावकरी तसेच समर्थांच्या वंशजांसह भक्तांच्या भावना तीव्र झालेल्या होत्या. गावकरी व भक्तगणांनी काही दिवसांचा अल्टिमेटमदेखील दिला होता. जालना जिल्ह्यातील जाम समर्थ येथील या मूर्त्या चोरीला गेल्यानंतर या घटनेचे प्रतिसाद



देशाबाहेरही उलटले होते. परदेशात असलेल्या भक्तांनी देखील आपल्या तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करत संताप व्यक्त केला होता.

घनसावंगीचे आमदार राजेश टोपे यांनी विधानसभेत चौकशीची मागणी केली होती तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी फोन वरून बोलणं करत भक्तांना तपास लावण्याचे आश्वासन देत पोलीस यंत्रणेला सूचना दिल्या होत्या. परंतु सरी पोलीस यंत्रणा मागे लागूनही दोन महिने उलटले तरी चोर पोलिसांना गुंगारा देण्यात यशस्वी झाले होते. अशात शुक्रवारी सकाळी सकाळीच ही माहिती येऊन धडकताच पोलीस यंत्रणेसह सर्वांचाच जीव भांड्यात पडला आहे.

दरम्यान, LCB चे पथक दोन्ही महिलांना घेऊन आल्यानंतरच या पूर्ण चोरीचा तपास उलगडला जाणार आहे. तर या बातमीमुळे संपूर्ण गावात आनंदाचं वातावरण असून सगळ्यांना आता पोलिसांच्या येण्याची प्रतिक्षा आहे.

## सलग १० वर्षे अशी दिवाळी अशी साजरी केली


सुराज्य/सांगली : देशभरात दिवाळीचा उत्साह आहे. महाराष्ट्रातही मोठ्या उत्साहात दिवाळी साजरी होत आहे. दरवर्षी दिवाळीत फटाके न वाजवण्याचे, दिवाळी फटाकेमुक्त साजरी करण्याचे आवाहन केले जाते. मात्र याला हवा तसा प्रतिसाद मिलत नाही. अनेक शहरात, गावात फटाक्यांची मोठ्या प्रमाणात आतषबाजी केली जाते. असे असताना एक मात्र १०० टक्के फटाकेमुक्त झाले आहे.



या फटाक्यांमुळे दिवसेंदिवस प्रदूषणामध्ये प्रचंड वाढ होते, दिवाळीत फोडल्या जाणाऱ्या फटाक्यांमुळे प्रदूषणाचा स्तर हा नेहमीच्या होणाऱ्या प्रदूषणाच्या कित्येक पटीने वाढतो, असा निष्कर्ष देखील समोर आला आहे. प्रदूषणमुक्त दिवाळी, फटाकेमुक्त दिवाळी असे दरवर्षी बोलले जात असले, तरी प्रत्येक्षात मात्र तसे होताना दिसत नाही.

दरवर्षी मोठ्या प्रमाणात फटाक्यांची आतषबाजी होते आणि तितकेच प्रदूषणही होते. मात्र एक गाव असे आहे, ज्या ठिकाणी फटाकेमुक्त दिवाळी साजरी केली जाते. सांगलीच्या शिराळा तालुक्यातील पाडळी गावी यंदाही फटाकेमुक्त दिवाळी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली आहे.

# रद्दी विकून कमावले २५४ कोटी रुपये



सुराज्य/नवी दिल्ली

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राबवलेल्या स्वच्छता अभियानकडून प्रेरणा घेत केंद्र सरकारने एक महत्त्वाची गोष्ट केली आहे. गेल्या तीन आठवड्यापासून सरकारी कार्यालयातील रद्दी, ई-कचरा आणि फर्निचर विकून जवळपास २५४ कोटींची कमाई केली आहे. इतकेच नव्हे तर ज्या जागेवर या रद्दी व फाइल ठेवल्या जात होत्या, त्या सर्व हटवण्यात आल्या असून त्या विकण्यात आल्या. त्यानंतर सेंट्रल विस्टाइतकी म्हणजेच जवळपास ३७ लाख वर्ग फूट जागा खाली करण्यात आली आहे. इंडिया पोस्टच्या कार्यालयात अशा जागेवर कर्मचाऱ्यांसाठी कँटिन आणि गॅलरी करण्यात आली आहे.**

'इंडिया पोस्ट'ने या कँटिनचे नाव 'आंगन' ठेवले आहे. या जागेत गेल्या कित्येक वर्षांपासून कचऱ्यांचा ढीग पसरला होता. रद्दी, खराब एसी, कूलर, कॉम्प्युटरसह खराब फर्निचर ठेवण्यात आले होते, असे चीफ पोस्ट मास्टर मंजू कुमार यांनी म्हटले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वच्छता अभियान या उपक्रमातून प्रेरणा घेत आम्ही सगळे सामान रद्दीत विकले आहे.

त्यातून लाखोंची कमाई झाली आहे आणि त्यातून हे सुंदर कँटीन आणि शानदार गॅलरी उभारण्यात आली आहे, असे डेप्युटी डायरेक्टर जनरल अमरप्रीत डुग्गल यांनी म्हटले आहे.

केंद्र सरकारने अनेक सरकारी कार्यालयात हे अभियान हाती घेतलं आहे. यात इंडियन पोस्टचे जवळपास १८ हजार, रेल्वेचे ७ हजार स्टेशन, फार्मास्यूटिकल विभागाचे ६ हजार, संरक्षण विभागाचे ४ हजार ५००, गृह मंत्रालयाचे जवळपास ४९०० साइट्सचा यात सहभाग आहे. यातील सरकारी कार्यालयात रिकाम्या असलेल्या जागा वापरात येऊ शकतील. सरकारच्या तिजोरीतही भर पडली आहे.

वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार ही मोहिम अन्य कार्यालयातही चालवली जाणार आहे.

# शिंदे-फडणवीस सरकार गुजरातचे एजंट

सुराज्य/मुंबई



**महाराष्ट्रातील उद्योगधंदे, महत्वाच्या संस्था गुजरातला घेऊन जायच्या, मुंबई आणि महाराष्ट्राचे महत्व कमी करायचे. या ध्येयाने केंद्राने मोदी सरकार गेल्या आठ वर्षापासून काम करत आहे, असा हल्लाबोल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. राज्यात सत्ताबद्दलानंतर आलेले शिंदे फडणवीस सरकार हे तर गुजरातचे एजंट होऊन महाराष्ट्रातील उद्योगधंदे गुजरातला पाठवत आहे. एक दिवस हे सरकार मुंबई ही गुजरातला देऊन टाकतील. महाराष्ट्राचे नुकसान करून गुजरातचे हित जोपासणारे शिंदे फडणवीस महाराष्ट्रद्रोही आहेत हे स्पष्ट झाले आहे, असेही पटोले म्हणाले.**

महाराष्ट्र देशातील प्रथम क्रमांकाचे राज्य आहे. देशातील सर्वात जास्त मोठे उद्योग महाराष्ट्रात आहे. गुजरात महाराष्ट्राच्या मागे आहे याचे शल्य पंतप्रधान मोदींना आहे. त्यामुळेच त्यांनी पंतप्रधान झाल्यापासून महाराष्ट्रातील महत्वाचे प्रकल्प आणि संस्था गुजरातला हलवण्याचा सपाटा लावला आहे, असा आरोप पटोले यांनी केला आहे. दुर्दैवाने यापूर्वीचे फडणवीस आणि आताचे ईडी या दोन्ही सरकारांनी महाराष्ट्राचे हित डावलून मोदींच्या गुजरातच्या हिताला जास्त महत्व दिले आहे. फडणवीस सरकारच्या काळात मुंबईतील आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्र, पालघर येथील प्रस्वातील मरीन अकादमी, मुंबईतील डायमंड बोर्स असे अनेक महत्वाचे प्रकल्प गुजरातला गेले, असेही नाना पटोलेंनी म्हटले आहे.

# सोलापूर-उजनी दुहेरी जलवाहिनीच्या कामास लवकरच सुरुवात

## ▪ लक्ष्मी इंजिनिअर्स कंपनीला दिली वर्कऑर्डर

सुराज्य/सोलापूर

उजनी-सोलापूर दुहेरी जलवाहिनी टाकण्याच्या ६३५ कोटींच्या कामाचा मक्ता लक्ष्मी कंपनीला देण्यावर स्मार्ट सिटी कार्पोरेशनच्या बैठकीत शिक्कामोर्तब झाला झाला होता.दरम्यान, अखेर या कामाची वर्क ऑर्डर गुरुवारी स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कंपनीने लक्ष्मी इंजिनीअर्स कंपनीला देण्यात आली आहे. त्यामुळे आता या कामास सुरुवात होणार आहे. अडथळ्यांची शर्यत पार करत अखेर हा विषय मार्गी लागला आहे. यापूर्वीचा कामातील खोळंबा झाल्याचा कटू अनुभव पहाता आता हे काम पूर्ण होण्यासाठी महापालिका प्रशासन अधिक दक्षता घेणार आहे.

गेल्या कोरोनामुळे तसेच भूसंपादनामुळे गेल्या दोन वर्षापासून दुहेरी पाईपलाईनचं काम पूर्णपणे ठप्प होतं.यापूर्वीच्या मक्तेदाराने



केवळ १५ किलोमीटरचे काम केले होते. प्रशासनाचेही दुर्लक्ष झाले असल्याचा आरोप होता. आता नव्या मक्तेदाराला या कामाचा मक्ता देण्यात आला आहे. नव्याने टेंडर काढण्यात आले होते. लक्ष्मी इंजिनिअर्स या कंपनीला हा मक्ता देण्यात आला आहे. गुरुवारी या कामाची वर्कऑर्डर स्मार्ट सिटी कंपनीनने त्यांना दिली आहे. लक्ष्मी इंजिनिअर्सने १.६७ टक्के बिलोने टेंडर टाकल्याने त्यांना ठेका मिळाला आहे. त्यातून स्मार्ट सिटीची ४ कोटी रुपयांची बचत होणार आहे. २४ महिन्याच्या आत हे काम पूर्ण करण्यात येणार आहे. कंपनीने आता पाईप खरेदीस सुरुवातही केली. सोलापूर - पुणे रस्त्याच्या डाव्या बाजूने राष्ट्रीय महामार्गाच्या जागेतून ही पाईपलाईन टाकण्यात येणार आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने यास यापूर्वी मंजूरी दिली आहे. त्यामुळे भूसंपादनाचा प्रश्न मिटला आहे, अशी माहिती स्मार्ट सिटी डेव्हलपमेंटचे मुख्य कार्यकारी अधिकारी त्रिंबक ढेंगळे पाटील यांनी दिली. ११० एमएलडी पाणी दुहेरी पाईपलाईन मधून येणार होते परंतु नव्या टेंडरनुसार त्यात दिडपट वाढ झाली आहे. दररोज सुमारे १७० एमएलडी पाणी येणार आहे. दोन वर्षात हे काम पूर्ण झाल्यास सोलापूरकरांना दररोज पाणी पुरवठा होऊ शकणार आहे.

### पुन्हा येरे माझ्या मागल्या नको

राज्य शासनाकडून या कामासाठी २०० कोटी रुपये निधीसाठी महापालिका प्रशासनाने पत्रव्यवहार केला आहे. याच्या पूर्ततेसाठी स्मार्ट सिटी चे मुख्य कार्यकारी अधिकारी डेंगळे -पाटील व महापालिका आयुक्तांनी यांनी पाठपुरावा करावयाचा आहे अशा सूचना चेअरमन गुप्ता यांनी केल्या होत्या. शासनाच्या पुरवणी प्रस्तावामध्ये हा विषय मार्गी लागणार आहे. स्मार्ट सिटी व महापालिका प्रशासनाच्या निगराणीखाली दर आठवड्याला वर्कशीट प्रमाणे काम करण्याची आवश्यकता आहे अन्यथा पुन्हा येरे माझ्या मागल्या असेच म्हणावे लागेल.



### दर आठवड्याला वर्कशीटप्रमाणे काम झाले पाहिजे : पी.शिवशंकर

दुहेरी जलवाहिनीचे काम नियोजना प्रमाणे व्हावे, या दृष्टिकोनातून महापालिका प्रशासन दक्षता घेणार आहे. दर आठवड्याला वर्कशीट प्रमाणे काम झाले पाहिजे. त्यासाठी स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दर आठवड्याला या कामाची पाहणी करावी. त्याचबरोबर दर पंधरा दिवसांनी महापालिका प्रशासन या कामाचा आढावा घेणार आहे. कराराप्रमाणे हे जलवाहिनी टाकण्याचे काम संबंधित कंपनीला पूर्ण करावयाचे आहे, असे महापालिका आयुक्त पी शिवशंकर यांनी स्पष्ट केले आहे.



## छत्रपती शिवाजी महाराजांचे किल्ले प्रेरणा देणारे : अमोल शिंदे

सोलापूर : दिवाळी सणात मुलांमध्ये किल्ले बांधणी स्पर्धेचे आयोजन करण्यास प्रोत्साहन करून शिवप्रेम जागृत करण्याचे काम शिवालय सामाजिक संस्थेच्या वतीने करण्यात येते याचा अभिमान वाटतो. मुलांमधील सुप्त गुणांना वाव मिळतो. याच बरोबर किल्ल्यां विषयी माहिती होते. किल्ले हे प्रेरणा देणारे असल्याचे शिवसेना जिल्हाप्रमुख अमोल शिंदे यांनी व्यक्त केले. शिवालय सामाजिक संस्थेच्या वतीने दिवाळी निमित्त किल्ले बांधणी सजावट स्पर्धेच्या विजेत्यांना पारितोषिक वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला यावेळी शिंदे बोलत होते. या स्पर्धेत शहरातील एकशे आठ स्पर्धकांनी सहभाग नोंदविला होता यातून प्रथम तनिश धारा, द्वितीय साजिद शेख, तृतीय आर्यन गवारे तर प्रोत्साहन पर मंगल विहार कॉलनी यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी माजी उपमहापौर दिलीप कोल्हे, विनोद भोसले, शशी थोरात, ह.भ.प. सुधाकर महाराज इंगळे, राम गायकवाड, हाजी मतीन बागवान, निवृत्त कार्यकारी अभियंता तुकाराम देवकर, उद्योजक सुखदेव शिंदे, पोपट भोसले, संस्थापक प्रकाश शिंदे उपस्थित होते. कार्यक्रमासाठी शिवानंद सोलापूरे , प्रशांत बिराजदार. ओंकार केकडे, विनोद शिंदे,स्वप्नील कुलकर्णी, अभिजित बिडवे ,मोहन चटके, सागर चव्हाण, महेश पवार, साबीर शेख, चेतन लिगाडे, रवी अंधारे, सूरज वाजपेयी आकाश शिंदे, अमोल वाघमारे, केदार जगदाळे, शिवेंद्र गायकवाड, विशाल चंदेले आदींनी परिश्रम घेतले. आभार सुरेश रुपनर यांनी मानले

## जाब विचारल्याच्या कारणावरून मारहाण

सोलापूर : जाब विचारल्याच्या कारणावरून मारहाण केल्याप्रकरणी तीन जणांविरुद्ध सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना बेडरपुर सोलापूर येथे घडली. याप्रकरणी राधिका संतोष गुंगेवाले (वय-३०, बेडरपुल) यांनी सदर बाजार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून लक्ष्मी गुंगेवाले, अजय गुंगेवाले, सुनीता फटफटवाले यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास पोलीस नाईक माडे करीत आहेत.



दिवाळी पाडव्याचा शुभमुहूर्त साधनत सोलापुरकरांनी मनसोक्त खरेदी केली. यादिवशी हजारांपेक्षा अधिक दुचाकींची विक्री झाली असून करोडोंची उलाढाला यंदा झाली आहे.

## फटाके उडविण्यावरून दोन गटात मारहाण

सोलापूर : फटाके उडवण्याच्या कारणावरून दक्षिण कसबा येथील दर्शन हाइट्स अपार्टमेंटमध्ये दोन कुटुंबात मारामारी झाली.दोन्ही गटातील सहा जणावर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल झाले आहे. रविराज जगदीश भुमकर (वय-२९,रा.दक्षिण कसबा दर्शन अपार्टमेंट) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार वडील फटाके उडवत असताना कृष्णकांत कटारे, यश कटारे, स्वप्निल कटारे आणि एकाने त्यांच्या वडिलांना येथे फटाके का उडवता असे म्हणत मारहाण केली तसेच आई व काकू यांनाही मारहाण करून जीवे मारायची धमकी दिली.

यश कृष्णकांत कटारे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार आरोपी जगदीश भूमकर हे हातात फटाके धरून फेकत असताना फटाके फिर्यादीचा भाऊ स्वप्निल यांच्या जवळ फुटला. या कारणावरून आरोपी जगदीश भुमकर,रविराज भूमकर यांनी हाताने मारहाण करत शिवीगाळ केली. तपास पोलीस नाईक कामूर्ती हे करीत आहेत.



## सातपुते यांनी ऊसतोड मजुरांची दिवाळी केली गोड

निमगाव : माळशिरस तालुक्याचे आफ राम सातपुते यांच्या पत्नी संस्कृती सातपुते यांनी ऊसतोड मजुराच्या कुटुंबाला संपूर्ण पोशाख करीत व मिठाईवाटप करीत ऊसतोड मजुरांसोबत दिवाळीचा आनंद साजरा केला. माळशिरस तालुक्यात ऊस तोडणी साठी आलेल्या धुळे, नंदुरबार, बीड, नगर आदी जिल्ह्यातील ऊसतोड कामगारांच्या राणावणातील कोपींवर व पालावर जात त्या घरातील कर्त्या पुरुषाचा संपूर्ण ड्रेस ,त्याच्या पत्नीची साडी, लहान मुलांची कपडे, खेळणी व मिठाईवाटप करीत त्यांची दिवाळी साजरी केली. ऊसतोड मजुरांच्या व्यथा व वेदना काय असतात याची माहिती आ. राम सातपुते यांना आहे. त्यांच्या वडिलांनी देखील याच तालुक्यात ऊसतोड केलेली आहे. त्याची जाण व सामाजिक संवेदना याची जाणीव ठेवत संस्कृती सातपुते यांनी या ऊसतोड मजुरांसोबत साजरी केलेली दिवाळी ही ऊसतोड मजुरांच्याच नव्हे तर संपूर्ण माळशिरसकरांच्या मनाला भावली.

## अक्कलकोटजवळ अपघात; एक ठार चार जखमी

सुराज्य/अक्कलकोट

अक्कलकोट सोलापूर रस्त्यावर नाशिकहून अक्कलकोट येथे देवदर्शनाकडे निघालेल्या होंडा मोबिलीयो ( एम एस ४७ ए ००८१) हे चार चाकी वाहन डिव्हायडरवर चढल्याने अपघात झाला. ही घटना दिनांक २६ रोजी सकाळच्या सुमारास घडली. यात प्रमिला प्रकाश बर्वे (वय ५७, रा. पंचवटी, नाशिक) या महिलेचा मृत्यू झाला तर चौघे किरकोळ जखमी झाले आहेत.



२६ रोजी नाशिक येथील एक कुटुंब अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ दर्शनासाठी येत होते. वाहन चालकाच्या दुर्लक्षमुळे चार चाकी रस्त्याच्या डिव्हायडरला जोरात धडक देऊन डिव्हायडर चढून वर जाऊन थांबले. यामध्ये प्रमिला प्रकाश बर्वे यांच्या डोक्याला मार मृत्यू झाला . यासह चालक तेजस यांच्या छातीस आणि पोटात मार लागला यांच्यासह फिर्यादी जानवी गायधने व दोन लहान मुलांना सुद्धा किरकोळ जखमी झाले. तेजस पद्माकर गायधने रा. नाशिक याने आपल्या ताब्यातील वाहन रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून निष्काळजीपणाने चालवल्याने फिर्यादी जानवी गायधनी यांच्या आईच्या मृत्यूस कारणीभूत ठरवून अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

### सिंदखेड येथे विषारी औषध पिल्याने मृत्यू

अक्कलकोट तालुक्यातील सिंदखेड येथे ४० वर्षीय पुरुषाने विषारी औषध पिल्याने मृत्यू झाला. ही घटना दि.२८ रोजी सकाळी सिंदखेड येथे घडली. कृष्णात बळी बंडगर (वय ४०) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. कृष्णात बळी बंडगर वय ४० रा.सिंदखेड याने अज्ञात कारणाने राहत्या घरात हरभरा पिकावर फवारण्याचे विषारी औषध पिल्याने मृत्यू झाला. मयत कृष्णा हे आपल्या राहत्या घरात बेशुद्ध अवस्थेत पडलेले आढळले, त्यांच्या तोंडातून फेस येत होता बाजूला हरभरा पिकावर मारण्याचे औषध आढळून आले. तपास पोलीस हवालदार अजिंक्य बिराजदार हे करीत आहेत.



जोडभावी पेठ येथील भावना श्रीनिवास इप्पाकायल हिने दिवाळीनिमित्त बोम्मारेलू उत्सवात आकर्षक सजावट केली.

## शिरवळ येथे गळफास घेऊन आत्महत्या

अक्कलकोट : अक्कलकोट तालुक्यातील शिरवळ येथील ३२ वर्षीय पुरुषाने अज्ञात कारणाने रामफळाच्या झाडाला दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना दि २५ ते २६ दरम्यान शिरवळ येथे घडली. लक्ष्मण चंद्रकांत चव्हाण (वय ३२) वर्ष याने अज्ञात कारणावरून गणेश अशोक मोरे यांच्या शेतातील रामफळाच्या झाडाला दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केली. आत्महत्या कशामुळे केली हे कारण अद्याप अस्पष्ट आहे.या घटनेची खबर मल्हारी चव्हाण यांनी दिली. तपास पोलीस करीत आहेत.



## लम्पीबाबत आ.शिंदे यांनी घेतली आढावा बैठक

कुर्डूवाडी : सोलापूर जिल्ह्यातील करमाळा तालुक्यांमध्ये सध्या लम्पी या जनावराच्या साथीच्या आजाराने थैमान घातलेले आहे. यासंदर्भात आ. संजयमामा शिंदे यांनी करमाळा येथे आढावा बैठक घेतली. या बैठकीला पशुधन विकास अधिकारी डॉ. प्रवीण शिंदे, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन तथा सनियंत्रण अधिकारी लम्पी चर्मरोग डॉ. एस. एस. भिंगारे हे उपस्थित होते.

सध्या ६४०३६ पशुधन करमाळा तालुक्यात असून यापैकी १४०१ जनावरांना लम्पी ची बाधा झालेली असून यापैकी ५७४ जनावरे उपचार घेऊन बरी झालेली आहेत. सद्यस्थितीत ८२७ जनावरावरती उपचार सुरू आहेत. तर १४ जनावरांचा मृत्यू या लम्पीने झालेला असून ५६१०० जनावरांना लसीकरण पूर्ण झाले असल्याची माहिती यावेळेस डॉ. शिंदे यांनी दिली. यानंतर पशुसंवर्धन विभागाला येणाऱ्या अडचणी संदर्भात आमदार संजयमामा शिंदे यांनी राज्याचे महसूल, पशुसंवर्धन व दुग्धविकास मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना निवेदन दिले.



करमाळा विधानसभा मतदारसंघात सध्या लम्पी आजाराने थैमान घातले आहे. या आजारावर नियंत्रण मिळवण्यासाठी विलगीकरण केंद्राची आवश्यकता आहे .प्रत्येक शेतकऱ्याच्या घरी जाऊन पशुवैद्यकीय सेवा देण्यास डॉक्टरांना विलंब होत आहे. त्यामुळे जनावरांसाठी विलगीकरण केंद्र तयार करण्यात यावे. तसेच जनावरांसाठी दर्जेदार औषधे उपलब्ध करून देण्यात यावी. औषधासाठीचा निधी वाढवून द्यावा व त्याचा पुरवठा वेळेवर व्हावा. जनावरे मयत झाल्यानंतर त्यांचा पंचनामा करण्यासाठी गावपातळीवरील तलाठी आणि ग्रामसेवक यांचे सहकार्य मिळण्यासाठी आपले स्तरावरून संबंधितांना योग्य ते आदेश द्यावेत, असे निवेदनात म्हटले आहे.

### अक्कलकोटमध्ये ठाकरे गटाला धक्का

## तालुकाप्रमुख देशमुख, शहरप्रमुख योगेश पवार यांचा राजीनामा

अक्कलकोट : अक्कलकोट शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे तालुकाप्रमुख संजय देशमुख व शहरप्रमुख योगेश पवार यांनी पक्षाला सोड चिठ्ठी देत तडकाफडकी पक्षप्रमुख ठाकरे यांच्याकडे पक्षपदाचा व पक्ष सदसत्वाचा राजीनामा दिला पाठवला आहे.



गेल्या अडीच वर्षापासून तालुक्यात व अक्कलकोट शहरात कुठलीच कामे न झाल्याने पदाधिकारी मध्ये नाराजी होती. त्यामुळे आम्ही पक्ष पदाचा राजीनामा देत असल्याचे संजय देशमुख व योगेश पवार यांनी सांगितले.गेल्या अनेक दिवसांपासून तालुका शिवसेनेत ही धुसफूस सुरु होती ती आजपर्यंत कुठेच थांबताना दिसून येत नव्हती.शेवटी आज तालुकाप्रमुख संजय देशमुख व शहरप्रमुख योगेश पवार यांनी पक्ष प्रमुखाकडे तडकाफडकी राजीनामा दिल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.राज्यात सत्तांतर होऊन शिवसेनेत उभी फूट पडली आहे.याचा परिणाम आता तालुक्यात ही दिसू लागला आहे.सध्या राज्यात शिवसेनेत उभी फूट पडून एकनाथ शिंदे गट व उध्दव ठाकरे गट अस्तित्वात आल्याने आता ग्रामीण भागात ही याचा परिणाम दिसू लागला आहे.

## पी.बी.ग्रुपतर्फे सफाई कर्मचाऱ्यांचा सन्मान

सुराज्य/सोलापूर

प्रबुद्ध भारत तरुण मंडळ (पी. बी. ग्रुप) च्यावतीने सफाई कर्मचाऱ्यांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. सोलापूर महानगरपालिकेचे मा.आयुक्त पी. शिवशंकर यांना सोलापूर महानगरपालिका मा. गटनेते तथा प्रबुद्ध भारत तरुण मंडळाचे प्रमुख मार्गदर्शक आनंद चंदनशिवे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी सोलापूर महानगरपालिकेचे मंडई व उद्यान समिती सभापती गणेश पुजारी विभागीय कार्यालय क्रमांक विभागीय अधिकारी चौबे, घनकचरा व्यवस्थापनचे साहाय्यक सफाई अधीक्षक मेंडगुळे, उद्योजक तुकाराम गायकवाड टाकळीकर, मंडळाचे अध्यक्ष संदीप कापुरे इत्यादी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. चंदनशिवे यांनी व्यक्त करीत असताना महानगरपालिकेचे कर्मचारी काम करीत असताना अनेक अडचणी येत असतात अनेक अडचणी येत असतात. मी सुद्धा सफाई कर्मचाऱ्यांचा मुलगा आहे.

प्रामाणिकपणे सर्व कर्मचारी काम करीत असतात, त्यांचा सन्मान करावा म्हणून हा कार्यक्रम ठेवल्याचे सांगितले. आयुक्त




यांच्या शुभहस्ते सर्व ५०० पेक्षा जास्त सफाई कर्मचाऱ्यांना मिठाई वाटप करण्यात आले.

यावेळी प्रबुद्ध भारत तरुण मंडळाचे प्रमुख गौतम चंदनशिवे, सचिव आदित्य चंदनशिव, अविनाश भडकुंबे, सूर्यकांत लोखंडे, विजय साळुंखे, आरोग्य निरीक्षक प्रवीण सातपुते, नरसिंह बच्चू, मुकेश बद्दूरकर, सचिन कदम, जितू मोरे, राहुल मस्के, संजय इंगळे, सिकंदर शेख आदी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार श्रीमंत जाधव यांनी प्रास्ताविक गटनेते आनंद चंदनशिवे यांनी केले.

## उध्दव ठाकरेंनी निष्ठेची कदर न केल्यामुळे शिंदे गटात प्रवेशाचा निर्णय : आंधळकर

बार्शी : अकरा वर्षे अनेक अडचणींना तोंड देत पक्षाचे काम करूनही ठाकरेंनी निष्ठेची कदर न केल्यामुळे शिवसेना सोडून शिंदे गटात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला असल्याची घोषणा शिवसेना नेते भाउसाहेब आंधळकर यांनी पत्रकार परिषदेत केली. यावेळी शिवसेना शहर प्रमुख दिपक आंधळकर, बापु तेलंग आदी उपस्थित होते.

यावेळी आंधळकर म्हणाले पोलीस खात्यामध्ये ३४ वर्षे सेवा केली अनेक गुन्ह्यांचा तपास लावला. वेळोवेळी कर्तव्याचे पालन करताना राजकिय नेत्यांबरोबर संघर्षाचे प्रसंग ओढवले त्यानंतर सेवानिवृत्ती झाली. शिवसेना प्रमुखांच्या विचारांचा प्रभाव होता. त्यामुळे पक्षप्रमुख उध्दव ठाकरेंच्या उपस्थितीमध्ये जाहिर सभेत शिवसेना प्रवेश केला. शिवसेनेतून पदे उपभोगलेल्यांनी पक्ष वाऱ्यावर सोडला. अडचणीच्या काळात भगवा खांद्यावर घेतला. राज्यात शिवसेनेच्या विरोधातले सरकार होते. त्यामुळे सत्तेचा दुरूपयोग झाला. माझ्या विरोधात सी.बी. आय. ॲन्टीकरपशनच्या चौकशा लागल्या. राजकिय सुडबुध्दीने माझे राजकारण संपविण्याचे प्रयत्न झाले. तरीही शिवसेनेच्या वतीने स्थानिक निवडणुका लढविल्या. निवडणुकांमध्ये तण, मन, धनाने सर्वस्व ओतले. मात्र विधानसभेच्या उमेदवारी देताना दोन वेळा डावलले गेले. सन २०१४ ते २०१९ आणि नंतर २०१९ ते २०२२ या काळात शिवसेना सत्तेवर होती. मात्र निष्ठावंत म्हणून पक्षाने कोणतेही स्थान दिले नाहीत. लॉकडाउन काळात स्वखर्चाने मोठे अन्नदान केले. पण ८० टक्के समाजकारणाचे सुत्र असणाऱ्या शिवसेनेने माझ्या कार्याकडे दुर्लक्ष केले. पक्षासाठी केलेल्या त्यागाची कसलीही दखल शिवसेना नेत्यांनी घेतली नाही. नुकतेच खडीक्रशरचे रॉयल्टीबाबत झालेल्या तक्रारीवरून कोट्यावधी रूपयांचा दंड आकारण्यात आला. मात्र पक्षाने याबाबत कसलेही सहकार्य केले नाही. त्यामुळे नाईलाजाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची मुंबईत त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. चर्चा केली. त्यांनतर त्यांच्या खंबीर पाठबळाच्या आश्वासनावर शिंदे गटात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. मुख्यमंत्र्यांनी बार्शीत सभा देण्याचे मान्य केले आहे, असेही यावेळी आंधळकर म्हणाले.

